# संपादकीय

## अशोभनीय आणि अनुचित

भाऊसाहेब खांडेकर हे मराठीतले ज्ञानपीठाचे आद्य मानकरी. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त गेले वर्षभर देशात जागोजाग कार्यक्रम होत आहेत. वेगवेगळ्या भारतीय भाषांमध्ये खांडेकरांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद झाले, आणि त्या त्या भाषांमध्ये ते इतके लोकप्रिय ठरले की त्या भाषेतील वाचकांना ते आपलेच वाटले. गुजराती लोकांना वाटे की खांडेकर हे मूळ गुजरातीच आहेत. कानडी भाषक वाचकांना वाटे की खांडेकर हे मूळ कानडीतच लेखन करतात. तामिळनाडूच्या वाचकांना वाटे की हे तामिळ भाषकच आहेत. खांडेकर प्रथम मराठीत लिहितात आणि त्याचा अनुवाद आपल्या भाषेत होत आहे हे विसरले जावे - इतकी मोहिनी खांडेकरांनी त्या त्या भाषेच्या वाचकवर्गावर टाकलेली होती. अनेक भारतीय भाषांमध्ये पोचलेले पहिले मराठी कादंबरीकार म्हणून खांडेकरांचे महत्त्व लक्षणीय आहे हे जन्मशताब्दीनिमित्त वेगवेगळ्या प्रांतात जे कार्यक्रम झाले, त्यावरून स्पष्ट झाले. आपल्याकडे खांडेकरांच्या साहित्यावर टीका करण्याची एक जणू फॅशनच नवसाहित्याची भलावण करणाऱ्या सत्यकथा संप्रदायाच्या समीक्षक-प्राध्यापकात रूढ होती. खांडेकरांच्या सुभाषितवजा काव्यात्म भाषेची टिंगल केली जात होती, त्यांच्या कादंबऱ्यांतील ध्येयवादीची कालविसंगत म्हणून टर उडवली जात होती; खांडेकरांना ज्ञानपीठ पुरस्काराचा सन्मान प्राप्त झाल्यावरही या टीकाकारांचा सूर तसाच राहिलेला होता.

जन्मशताब्दीच्या निमित्ताने खांडेकरांच्या साहित्याचे पुनर्वाचन, पुनर्मूल्यमापन थोडेफार झाले. खांडेकरांच्या साहित्यातील दोष दाखवणाऱ्यांनाही खांडेकरांच्या वाचकप्रियतेचे गूढ कसे उकलावे हे कोडे पडले. १९३० ते १९५० या काळातील वाचकांच्या पिढीवर फडके-खांडेकरांचा जबरदस्त प्रभाव होता, त्यांनी तरुणवर्गाला जणू झपाटून टाकले होते, त्यांच्या ध्येयवादी नायकनायिकांचा आदर्श तरुणवर्गाला आव्हान देत राहिला होता. वर म्हटल्याप्रमाणे केवळ मराठी वाचकांपुरताच हा प्रभाव मर्यादित नव्हता, गुजराती, तामिळ, तेलगू, सिंधी, कानडी वगैरे भाषांमध्येही खांडेकरांच्या कादंबऱ्यांनी वाचकांना भारावून टाकले होते. हे त्यांच्या लोकप्रियतेचे परिमाण यापूर्वी आपल्याला तेवढेच उमगलेले नव्हते. रवींद्रनाथ, शरच्चंद्र, प्रेमचंद असे काही मोजकेच लेखक त्या काळी अखिल भारतीय मान्यतेचे असे असताना, दिल्लीत खांडेकर जन्मशताब्दीनिमित्त 'भारतीय ज्ञानपीठा'ने



आयेजित केलेल्या परिसंवादात 'उद्ध्वस्त धर्मशाळा' नाटकाचे लेखक व जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्राध्यापक गो. पु. देशपांडे यांनी खांडेकरांच्या विरोधी सूर लावून मराठीतील दोन्ही ज्ञानपीठ पुरस्कार हे अपात्री-अयोग्य होते असे विधान केले. दिल्लीत आपणच आपली किमंत घालवतो हा राजकीय क्षेत्रातला अनुभव, तो साहित्यक्षेत्रातही आढळावा याचा खेद वाटतो. गो. पु. देशपांडे यांच्या या वक्तव्याने अवघ्या महाराष्ट्रात खळबळ उडाली, प्रसंगाचे औचित्य तर गोपुंनी राखले नाहीच, एकूण प्रतिपादनही पूर्वग्रहदूषित मनोवृत्तीतून केले, नंतर स्वत:च त्यांनी खूप सारवासारव करून मी असे बोललोच नव्हतो, माझ्या विधानांचा चुकीचा अर्थ लावला गेला, माझ्या इंग्रजी भाषणाचा अनुवाद करताना गफलत झाली, वगैरे खुलासा करून, ''जर कोणाच्या भावना माझ्या भाषणाने दुखावल्या असतील तर मी त्यांची माफी मागतो'' असे गोपुंनी जाहीर केले. गो.पु. देशपांडे यांनी केलेली ही तथाकथित बौद्धिक व वाङ्मयीन शेर-ई-बाजी अशी मोहरमच्या वाघासारखी तकलादू व कातडीबचावू निघावी हे काही नवल नव्हे.

कोठल्याही साहित्यिकाचे लेखन घ्या, त्यावर उलटसुलट मते व्यक्त होतच असतात. कोणाला तो श्रेष्ठ वाटतो, कोणाला दुय्यम. वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक भूमिकांप्रमाणेही मूल्यमापन बदलते. विविध समीक्षाप्रणाली आहेत, त्यानुसारही आकलन-आस्वादात फरक पडतो. तेव्हा खांडेकरांचे साहित्य कोणाला आवडेल, कोणाला बिनमहत्त्वाचे वाटेल - हे खरेच आहे. परंतु गोपुंनी ज्याप्रकारे दिल्लीत खांडेकर-जन्मशताब्दीच्या कार्यक्रमात खांडेकरांवर बेछूट मुक्ताफळे उधळली व चिखलफेक केली ती सर्वच मराठी माणसांच्या अस्मितेवर आघात करणारी ठरली. एकूण मराठी साहित्याचेच अवमूल्यन व अधिक्षेप करण्याची त्यांची वृत्ती न्यूनगंड द्योतक असून ती आत्मघातकीपणाची आहे. मराठी भाषेतील साहित्याच्या दर्जाबद्दल परभाषकांच्या मनात संदेह निर्माण व्हावा आणि ते सामान्य प्रतीचे आहे असा त्यांचा समज व्हावा अशा तऱ्हेचे वक्तव्य गोपुंसारख्या व्यक्तीने करणे हा एकूण प्रकार निंद्य आहे, आणि प्रत्येक मराठी वाचकाने व लेखकाने त्याबद्दल त्यांचा निषेधच करायला हवा.

मराठी साहित्य हे भारतीय भाषांमध्ये तसेच जागतिक पातळीवर आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असताना, चांगल्या कृतींचे अनुवाद विविध भाषांत जावेत म्हणून झटत असताना, त्याबद्दल तुच्छतेचे व टवाळीचे उद्गार काढून त्या सर्व प्रयत्नांवर बोळा फिरवणे हा उद्योग गोपुंसारख्या सुज्ञ व्यक्तींनी राजधानी दिल्लीत राहून करणे हा मराठी भाषकाच्या दृष्टीने मोठाच प्रमाद आहे. असा आत्मघातकीपणा करणाऱ्या व्यक्तींना क्षमा नाही. साहित्याचे मूल्यमापन, पूनर्मूल्यमापन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे; परंतु

आपल्या भाषेतील सर्वच साहित्य हे एका फटक्यासरशी रद्दड आहे असे म्हणून आपले शहाणपण सिद्ध होते असे कोणी मानत असेल तर त्याचा तो डॉन क्विक्झोटसदृश भ्रम दूर करायलाच हवा. मराठी वाचकरसिकांनी गोपुंच्या व्यक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करून आपली नाराजी प्रभावीपणे प्रकट केली आहे, ही त्या दृष्टीने दिलासा देणारी बाब आहे.

**प्रा. आनंद यादव**

ह्या अंकात आम्ही आजचे मराठीतील आघाडीचे साहित्यिक आनंद यादव यांच्या साहित्याकडे लक्ष वेधण्याच्या दृष्टीने बरीच सामग्री दिली आहे. त्यांची जडणघडण, त्यांच्या काही पुस्तकांचे परिचय यांना या अंकात स्थान दिले आहे. पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळे बरीच सामग्री जवळ असूनही देणे शक्य झाले नाही. ‘काचवेल’ हा आत्मचरित्रात्मक कादंबरीचा अखेरचा भाग आणि ‘आत्मचरित्रमीमांसा’ ही दोन पुस्तके नुकतीच प्रकाशित झाली आहेत. डॉ. यादव हे ग्रामीण साहित्य चळवळीच्या अग्रस्थानी आहेत, तसेच आपल्या निर्मिति प्रक्रियेकडेही ते जागरुकपणे पाहत असतात. कादंबऱ्या, कथा, ललित गद्य, समीक्षा, कविता अशा विविध वाङ्मयीन दालनांमध्ये त्यांनी संचार केलेला आहे. त्याची थोडीशी झलक वाचकांना हा अंक दाखवू शकेल असे वाटते.

- संपादक

*“अत्यंत अल्प मानधनात सुंदर-सुंदर लेख वृत्तपत्रांसाठी पुरविणाऱ्या मराठी साहित्यिकांमुळे, तर त्यांचा असा गैरसमज झाला नसावा ना?”*

## *आनंद यादव : ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवक्ते*

आनंद यादव यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यात कागल येथे शेतकरी कुटुंबात झाला. पूर्वजांच्या जकात गोळा करण्याच्या व्यवसायावरून जकाते हे पडलेले पडनाव आणि यादव हे आडनाव. त्यांचे वडील रत्नाप्पा जकाते यांची स्वत:च्या मालकीची शेती नव्हती. एका जमीन मालकाच्या शेतावर ते कूळ म्हणून सहकुटुंब राबत असत. आईचे नाव ताराबाई. एकूण बारा भावंडांपैकी आनंद यादव हे मुलांत मोठे. त्यामुळे मोठ्या मुलाने शेतीच्या कामात हातभार लावला पाहिजे ही वडिलांची अपेक्षा. भोवतालचे वातावरण कुठल्याही अर्थाने शिक्षणास अनुकूल नव्हते. ढोरा-गुरांमागे किंवा शेतात कामाला जाणे नेहमीचेच. अशा प्रतिकूल वातावरणात त्यांना लहानपणापासूनच शिक्षणाविषयी जबरदस्त ओढ होती. त्यांची शिक्षणाची ओढ आणि जिद्द पाहून सौंदलगेकर गुरुजींसारखे काही शिक्षक त्यांना मार्गदर्शन करू लागले.

आपल्या कुटुंबाची गरिबीच्या चक्रातून सुटका करावयाची असेल तर आपण शिकले पाहिजे, असे यादवांना वाटत असे. मुलांना शिकविले पाहिजे हा विचार वडील रत्नाप्पांच्या मनात नव्हता. शिक्षणाच्या नादाला लागलेल्या मुलाच्या पोटाला अन्न कुठले द्यायचे हा प्रश्न होता. या मुलाला शिक्षणाच्या वेड्या नादापासून परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. यादवांची शिक्षणाची ऊर्मी कमी होण्याऐवजी उलट वाढतच गेली. आईकडून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळत गेले. वडिलांची मर्जी व शेतीची कामे सांभाळून कुणाच्याही मदतीशिवाय स्वत: अभ्यास करण्याची सवय लावून घेतली. वाचता येऊ लागले तसतसा वाचनाचा छंद वाढत गेला. ते मिळतील तेथून पुस्तके आणून वाचू लागले. यातूनच साहित्याची आवड निर्माण झाली.

तमाशे-सिनेमे पाहणे, त्यातली गाणी व संवाद पाठ करणे, ते म्हणून दाखविणे, कविता करणे, त्या म्हणून दाखविणे, नकला-नाट्यछटा करणे यातून त्यांचे कलावंत मन अभिव्यक्ती शोधत होते आणि कळत-नकळत घडत होते. 'नटरंग'सारख्या कादंबरीचे अनुभवविश्व तमाशाच्या या नादामुळेच त्यांना गवसले असावे. ते लहान असताना त्यांचे घर शेतातच होते. 'गोतावळा'मध्ये व्यक्त झालेले निसर्गाचे सूक्ष्म तपशील त्यांच्या संवेदनशील मनाने या काळातच टिपून ठेवले असावेत. जानपद कविता वाचून आपणही त्या स्वरूपाची कविता लिहू शकतो अशी ऊर्मी दाटून आली. मराठी चौथ्या इयत्तेतला हा विद्यार्थी कविता लिहू लागला.



अडचणींतून मार्ग काढीत शालेय शिक्षण पूर्ण केले. आता तरी आपला मुलगा शिक्षणाचा नाद सोडून शिक्षकाची नोकरी करेल आणि संसाराला हातभार लावेल अशी वडिलांना आशा वाटत होती. परंतु यादवांना आता महाविद्यालयीन शिक्षणाचे वेध लागले होते.

विमनस्क मन:स्थितीत पळून जाऊन त्यांनी कोल्हापूर गाठले. उपासमार सोसली, प्रसंगी केळीच्या साली खाऊन दिवस काढले परंतु शिक्षणावरची निष्ठा ढळू दिली नाही. कोल्हापुरात मदतीचा हात मिळेल ही आशा फोल ठरली. स्वातंत्र्य सैनिक विष्णोबा सणगर हे यादवांना वृत्तपत्रे, पुस्तके वाचायला देत. त्यात भूदान, सर्वोदय या चळवळींविषयीचे साहित्यही असे. त्या विचारांनी प्रभावित झालेल्या यादवांना त्या चळवळीत सामील व्हावेसे वाटे. गावातल्या काही हितचिंतकांच्या मदतीने आणि विष्णोबांच्या मार्गदर्शनाने यादवांनी रत्नागिरी गाठले. तेथे सर्वोदय छात्रालयात राहून महाविद्यालयीन शिक्षण सुरू केले.

रत्नागिरीच्या वास्तव्यात त्यांच्यावर अधिक वाङ्मयीन संस्कार झाले. कवी य. द. भावे, प्रा. रा. वा. चिटणीस यांचा सहवास लाभला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मराठी कवितेचे वाचन वाढले. कविता लेखनासही बळ येत गेले. 'सत्यकथा' हे नववाङ्मयातील अग्रेसर मासिक पहिल्यांदा वाचायला मिळाले. सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांचा आश्वासक हात त्यांच्या पाठीवरून फिरला. त्यांचा आशीर्वाद आणि प्रोत्साहन ही यादवांच्या जीवनातली महत्त्वाची घटना ठरली. यादवांची बिकट आर्थिक परिस्थिती पाहून पु.लं.नी शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य दिले.

शिक्षण सुरू असतानाच ते रत्नागिरीहून कोल्हापुरास आले. गोखले कॉलेजमध्ये त्यांना अनुराधा पोतदार यांच्यासारख्या कवयित्री प्राध्यापिका म्हणून लाभल्या. त्यांच्या मार्गदर्शनामुळे काव्यलेखनास गती मिळाली. प्रा. भिंगारे, व. ह. पिटके, प्रा. ग. वि. कुलकर्णी यांच्याबरोबरच्या चर्चांतून त्यांची साहित्यविषयक जाण वाढत गेली. व. ह. पिटके यांच्याशी झालेल्या चर्चांतून त्यांना आपल्या अनुभवविश्वाच्या वेगळेपणाचे भान आले. चिकित्सक समीक्षकाचा पिंडही याच काळात घडू लागला.

'हिरवे जग'मध्ये संकलित झालेल्या कविता त्यांनी याच काळात लिहिल्या. व. ह. पिटके, अनुराधा पोतदार यांच्या प्रोत्साहनामुळे त्यांनी 'हिरवे जग'चे हस्तलिखित महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार स्पर्धेसाठी पाठवून दिले. विशेष म्हणजे त्यास पारितोषिकही मिळाले. यादवांचा आत्मविश्वास दुणावला.

कोल्हापूरच्या मित्रमंडळीचा यादवांच्या वाङ्मयीन जडणघडणीत मोठा वाटा आहे. त्यांनी समकालीन ग्रामीण साहित्याचे विपुल वाचन केले. शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथासाहित्याचे परिशीलन केले. श्री. म. माटे, मुक्तिबोध आणि माडगूळकर यांचे साहित्य त्यांना आवडले, 'मातीखालची माती' या संग्रहात संकलित झालेली व्यक्तिचित्रे लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्याचप्रमाणे 'एकलकोंडा' ही कादंबरीही त्यांनी या काळातच लिहिली.

बी. ए. झाल्यावर यादवांनी आकाशवाणी केंद्रावरील नोकरी आणि एम्. ए चे

उच्चशिक्षण यासाठी पुणे गाठले. शहरी माणसांच्या आत्मकेंद्रित आणि संकुचित वृत्तीचा अनुभव त्यांना पदोपदी येत होता. मातीशी असलेली आपली नाळ तुटू नये असे वाटत होते.

साहित्यविषयक जाण विकसित होण्यासाठी पुण्याचे सांस्कृतिक वातावरण पूरक ठरले. नामवंत लेखकांशी आणि समीक्षकांशी परिचय झाला. पुणे आकाशवाणी केंद्रावर व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, बा.भ. बोरकर यांचे सहकारी म्हणून कार्य करण्याची संधी लाभली. त्यांच्या सहवासात बरेच काही शिकायला मिळाले. शंकर पाटील यांच्याशी झालेल्या चर्चांतून कथानिर्मितीची प्रक्रिया लक्षात आली. 'गावकरी फड'साठी ग्रामीण श्रुतिकालेखन केले.

एम. ए. झाल्यावर प्राध्यापकाचा पेशा त्यांनी स्वेच्छेने स्वीकारला. आपल्या लेखन-वाचनादी कार्यास हाच पेशा अनुकूल ठरेल याची खात्री होती. घडलेही तसेच - अध्यापनाच्या निमित्ताने वाचन वाढले. मनन-चिंतनाचा आवाकाही अधिक वाढला. लेखनाची ऊर्मी प्रबळ होती परंतु पूर्वसूरींनी लिहिले तसेच लिहीत राहण्यापेक्षा आपला वेगळा ठसा निर्माण करावा अशी इच्छा होती. ग्रामीण साहित्याच्या मर्यादा जाणवत होत्या. मर्ढेकर, वा. ल. कुलकर्णी यांचे साहित्यविषयक नवविचार भावत होते.

यादवांनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळले. परंतु आपण प्राधान्याने ग्रामीण लेखक आहोत याचे भान दृष्टिआड होऊ दिले नाही. शिक्षण आणि नोकरीनिमित्त ते आपल्या घरा-गावापासून दूर गेले तरी त्या मातीला ते कधी विसरले नाहीत. हे ऋणानुबंध केवळ वाङ्मयीन नव्हेत तर कौटुंबिक आणि सामाजिकही आहेत. गावशिवारामध्ये, माणसांमध्ये लेखकाचा जीव गुंतून राहिला आहे.

यादवांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली तीच मुळात एक प्रकारच्या असमाधानातून. काही अपवाद वगळता जानपद कविता आणि १९५० ते ६० या काळात प्रसिद्ध झालेल्या ग्रामीण साहित्यातून खरे ग्रामजीवन चित्रित झालेले नाही अशी त्यांची धारणा होती. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्र रेखाटण्याच्या उद्देशाने त्यांनी लेखनास प्रारंभ केला. 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहातील कथा या संदर्भात लक्षणीय आहेत. 'मळ्याची माती' मधील काही कवितांतूनही या जाणिवा अभिव्यक्त झाल्या होत्या.

आपल्या अनुभवविश्वातील बदलत्या जाणिवांना साक्षी ठेवून ते विकसित होत गेले. एकेकाळी आकृतिनिष्ठ कलावादी जाणिवांच्या प्रभावाखाली असलेले यादव पुढील काळात कलावाद टाळून कलाशील राहून सामाजिकतेचा पुरस्कार करताना दिसतात. म. फुले त्यांना आधुनिक मराठी साहित्याचे जनक वाटतात. साहित्य ही मूठभरांची मिरास नसून ती एक सामाजिक वस्तू आहे, ही त्यांची भूमिका आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात तरी ग्रामीण बहुजनसमाजाचे सांस्कृतिक शोषण संपेल ही आशा होती. परंतु ती फोल ठरली. १९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित झालेला दलित साहित्याचा झंझावात उसळला. दलित साहित्य मराठी साहित्यापुढे एक आव्हान



होऊन उभे ठाकले. ग्रामीण समाजात झालेल्या शिक्षणप्रसारामुळे ग्रामीण नवतरुणही आता जागृत झाला होता. राजकीय परिस्थिती बदलली तरी सामाजिक परिस्थिती बदललेली नाही किंबहुना ती बदलणे इतके सोपे नाही याचे भान ग्रामीण सुशिक्षित नवतरुणाला आले होते. यादव हे या पिढीचे प्रतिनिधी होते. येथूनच त्यांच्या मनात आधुनिक ग्रामीण साहित्याची चळवळ मूळ धरू लागली. ग्रामीण साहित्याच्या वास्तववादी प्रवाहाला सामाजिकतेचे अधिष्ठान देण्याचा हा प्रयत्न होता.

आधुनिक ग्रामीण साहित्याची भूमिका यादवांनी ग्रामीण साहित्य संमेलने, मेळावे, परिसंवाद यातून वेळोवेळी मांडली. या चळवळीत उत्तरोत्तर नव्या दमाचे लेखक-कवी उदयास आले. खेड्यातला नवा लेखक लिहिता झाला पाहिजे. त्यांच्यावर वाङ्मयीन संस्कार झाले पाहिजेत या हेतूने त्यांनी काही संपादनेही केली आहेत. १९८१मध्ये त्यांनी बाबा पाटील यांच्या सहकार्याने 'तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा' हा कथासंग्रह संपादित केला त्यास प्रस्तावना लिहिली. (त्या पूर्वीही १९७० मध्ये त्यांनी १९२५ ते ७० या काळातील निवडक ग्रामीण कथांचा संग्रह संपादित केला होता.) चर्चासत्रे, कृतिसत्रे संयोजित केली. नवोदित साहित्यिकांना ते आस्थेने मार्गदर्शन करीत असतात.

यादवांनी हिरीरीने ग्रामीण साहित्यचळवळीचा पाठपुरावा केला. त्या चळवळीवर झालेले हल्ले परतवून लावले. त्यांचे युक्तिवाद ठोस असतात. मांडणीही नेटकी असते.

अक्षरशत्रू म्हणता येईल अशा सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातील मुलाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेले यश इतरांना प्रेरणादायक ठरणारे आहे. त्यांच्या 'झोंबी' आणि 'नांगरणी' या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांना वाचकप्रियता लाभली. शिक्षणाच्या माध्यमातून आपले जीवन घडवू पाहणाऱ्या बहुजन समाजतल्या सामान्य वाचकाला ती कथा जवळची वाटते.

यादवांनी वेगवेगळे वाङ्मयप्रकार समर्थपणे हाताळले आणि त्या त्या वाङ्मयप्रकारात आपले स्थान निर्माण केले. केवळ ग्रामीण साहित्याच्या संदर्भात नव्हे तर एकूणच मराठी साहित्यात आनंद यादव हे नाव महत्त्वाचे ठरते. कविता, कथा, कादंबरी, ललितगद्य आणि आत्मचरित्रात्मक कादंबरी या क्रमाने त्यांची वाङ्मयीन वाटचाल झालेली आहे. कोणताही वाङ्मयप्रकार केवळ चूष म्हणून हाताळला नाही. त्या त्या वेळी त्यामागे आविष्काराची अपरिहार्यता होती. म्हणूनच ते अनेक वाङ्मयप्रकारांतून ताकदीने लेखन करताना दिसतात. यादवांनी वेगवेगळे वाङ्मयप्रकार हाताळले, परंतु ग्रामीण जीवन हाच त्यांच्या साहित्याचा प्रधान विषय राहिला. त्यांनी समीक्षालेखन केले तेही ग्रामीण साहित्यप्रवाहाची शोधचिकित्सा करण्यासाठी, तत्संबंधी इतर अनेक प्रश्नांचा मागोवा घेण्यासाठी. ललितलेखन करीत असताना त्यांनी साहित्यविषयक प्रश्नांचे जे चिंतन केले त्यातून त्यांचे समीक्षालेखन घडले. एकाच वेळी सृजनशील साहित्यिक आणि चिकित्सक वाङ्मयविमर्शक या दोन्ही बाजू त्यांच्या व्यक्तित्त्वात एकवटल्या.

आपणच निर्माण केलेल्या किंवा मळलेल्या वाटेने न जाता अनुभवांच्या आणि आविष्काराच्या नव्या वाटा चोखळण्याचा प्रयत्न यादवांनी सतत केला. या संदर्भात 'झोंबी', 'नांगरणी' हा आत्मचरित्रात्मक कादंबरीचा प्रयोग लक्षणीय ठरावा. अर्थात प्रयोगासाठी प्रयोग असे त्याचे स्वरूप नाही.

खळ्यामळ्यापुरते मर्यादित अनुभवविश्व साकार करणारी त्यांची कथा (खळाळ) नंतरच्या काळात झपाट्याने बदलणारे ग्रामीण जीवन आकळण्याचा आणि ते अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करू लागली (डवरणी).

यादवांच्या साहित्यातून त्यांची प्रतिमा उभी राहते ती एक समाजमनस्क साहित्यिक म्हणूनच. आपल्या जाणिवांशी त्यांनी तडजोडी केल्या नाहीत. सुरुवातीच्या काळात त्यांच्यावर कलावादी जाणिवांचा प्रभाव होता. (खळाळ, गोतावळा). परंतु तेथेही आशयाच्या बाजूने विचार करता त्यांनी मराठी कथा-कादंबरीला नवे परिमाण दिले. ग्रामीण कथा-कादंबरीच्या संदर्भात वैशिष्ट्यपूर्ण टप्पा गाठला. यादवांनी लेखनास प्रारंभ केला तो काळ मर्ढेकर, वा. ल. कुळकर्णी यांनी मांडलेल्या आणि 'सत्यकथा' मासिकाद्वारे रूढ झालेल्या कलाविषयक जाणिवांच्या प्रभावाचा होता. यादवांची 'खळाळ'मधील कथा 'सत्यकथे'तूनच प्रसिद्ध झाली होती ही बाब नजरेआड करता येत नाही.

पुढील काळात आकृतिवादाकडे झुकणाऱ्या कलावादी जाणिवांच्या प्रभावातून यादव बाहेर पडले. त्यांच्या 'डवरणी' व 'उखडलेली झाडे' मधील कथांचे वेगळेपण 'खळाळ'च्या संदर्भात आणि 'झोंबी' व 'नांगरणी' या कांदबऱ्यांचे वेगळेपण 'गोतावळा' व 'नटरंग'च्या संदर्भात स्पष्टपणे जाणवते.

यादवांना साहित्यव्यवहाराची जीवनसापेक्षता तीव्रतेने जाणवत होती. विशेषत: निर्मितिप्रक्रियेचा विचार करताना साहित्यव्यवहाराची पाळेमुळे समाजजीवनात खोलवर रुजलेली असतात हे लक्षात आले. यातूनच कला आणि समाजवास्तव यांची सांगड घालू पहाणारी साहित्यकलाविषयक भूमिका घडत गेली. कलावादी असणे वेगळे आणि कलाशील असणे वेगळे असा फरक त्यांनी केला.

संस्कृत साहित्यविचार आणि पश्चिमेकडून आयात केलेल्या साहित्यविषयक संकल्पना येथील साहित्याच्या मूल्यमापनासाठी अपुऱ्या ठरतात हे मत नोंदवून तात्त्विक पातळीवरील साहित्यविचारास उपयोजित स्वरूप दिले. त्यामुळे निर्मितिप्रक्रियेभोवतीचे अलौकिकतेचे वलय विरण्यास मदत झाली. या संदर्भात त्यांनी मांडलेला माध्यमविचार महत्त्वाचा ठरतो. निवेदन आणि आविष्कार यातील भेद स्पष्ट करून ग्रामीण साहित्याच्या संदर्भात आविष्कारमाध्यम म्हणून ग्रामीण भाषेची अपरिहार्यता पटवून दिली. या भूमिकेला काही मर्यादा असल्या तरी समर्थ आविष्कारमाध्यम म्हणून ग्रामीण बोलीभाषांचे उपयोजन होत आहे हे आपण पाहतोच. ग्रामीण बोलीभाषा समर्थ आविष्कारमाध्यम ठरू शकते असा आत्मविश्वास ग्रामीण लेखकांमध्ये निर्माण



झाला. व्यावहारिक अनुभव आणि कलानुभव यांच्यातील परस्परसंबंध आणि कलानुभवाचा स्वरूपविचार हे विषयही समीक्षाविचारात मौलिक भर घालणारे ठरतात.

ललितलेखन वा समीक्षालेखन ही एक सामाजिक घटना आहे याचे भान कलाविषयक जाणिवेचाच हा भाग आहे. लेखकाने आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून लेखन करावे, वाचकांना ते कळेल की नाही याचा विचार करू नये असे म्हणताना यादव कलावादीच आहेत की काय असे वाटू लागते. परंतु सखोल विचार करता लेखकाच्या बाजूने सामाजिकता ही त्याच्या कलाविषयक जाणिवेतच सामावलेली असते आणि वाचकाच्या बाजूने पाहता त्याची जाणीव अभिव्यक्त अनुभव समजून घेण्याइतकी व्यापक झालेली असते असा याचा अर्थ आहे. त्यासाठी लेखकाला कुठल्या तडजोडी कराव्या लागत नाहीत, त्याने त्या कराव्यात अशी अपेक्षा वाचकही करीत नाही. म्हणजे हा कलाविचार वाचकाची सुजाण आस्वादक्षमता गृहीत धरतो.

जीवनशोधासाठी ललितसाहित्याची निर्मिती आणि साहित्य व समाजजीवन यांच्या अन्योन्य संबंधाचा शोध घेण्यासाठी समीक्षालेखन असे यादवांच्या लेखनाचे द्विविध स्वरूप आहे. साहित्यव्यवहाराची स्वत:ला जाणवलेली समाजसापेक्षता नव्या लेखकांना दाखवून देणे ही एक सांस्कृतिक जबाबदारी आहे. नवोदित ग्रामीण साहित्यिक आत्मविश्वासपूर्वक लेखनप्रवृत्त झाले. ग्रामीण साहित्याची चळवळ आकारास आली. ग्रामीण साहित्याच्या वास्तववादी परंपरेला अधिक समाजाभिमुख बनविले.

यादवांनी मांडलेली आधुनिक ग्रामीण साहित्याची भूमिका व्यापक आणि म्हणूनच समर्थनीय असली तरी भारतासारख्या विघटित समाजव्यवस्थेच्या देशात ती कितपत स्वीकारली जाईल याविषयी शंका वाटते. दुसरे म्हणजे भारतीय खेडे कितीही विकसित झाले तरी त्याचा आत्मा 'ग्रामीण' राहणार आहे का याविषयी शंका वाटते. आज ग्रामीण भागात शहरीकरणाचा आणि उच्चवर्णीय संस्कृतीत रुजलेल्या व्यक्तिवादी जाणिवांचा फैलाव हेत चालला आहे. या जीवनाची प्राकृतिकता आणि समूहनिष्ठ जीवनप्रणाली शबल होत चालली आहे. अर्थात हे परिवर्तन हेही ग्रामीण साहित्याचे मूलद्रव्य ठरणार आहे. उद्या ग्रामीण आणि शहरी जीवन असा भेद राहिला नाही तरी या साहित्याचे मोल कमी होणार नाही.

मूलभूत सामाजिक जाणिवा व्यक्त करणारे ललितलेखन आणि मराठी साहित्यविचारात महत्त्वाची भर घालणारे समीक्षालेखन या गुणवैशिष्ट्यांमुळे आधुनिक काळातील एक महत्त्वाचा लेखक म्हणून आनंद यादव यांची दखल घ्यावी लागेल.

*(आनंद यादव - व्यक्ती आणि वाङ्मय या पुस्तकातून - संक्षिप्त)*

***डॉ. रवीन्द्र ठाकूर***

# साहित्य वार्ता

**वि. पु. भागवत पुरस्कार ज्योत्स्ना प्रकाशनला**

मुंबई मराठी साहित्य संघातर्फे दिल्या जाणाऱ्या वि. पु. भागवत प्रकाशन पारितोषिकाचे या वर्षीचे मानकरी म्हणून मुंबईच्या ज्योत्स्ना प्रकाशन या संस्थेची निवड करण्यात आली आहे. पारितोषिक निवड समितीच्या ५ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. श्रीमती उषा तांबे, श्री. रवींद्र पिंगे व श्री. राजीव नाईक हे या समितीचे सदस्य आहेत. अडीच हजार रुपये रोख, भागवत स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, २१ फेब्रुवारी रोजी साहित्य संघाच्या डॉ. पुरंदरे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात तो गौरवपूर्वक प्रदान केला गेला.

---

**जयवंत दळवी स्मृति-पुरस्कार**

ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'मॅजेस्टिक प्रकाशन'तर्फे १६ सप्टेंबर या जयवंत दळवी यांच्या स्मृतीदिनी 'जयवंत दळवी स्मृती-पुरस्कार' दिला जातो. गेली दोन वर्षे 'कादंबरी' आणि 'नाटक' या दोन वाङ्मयप्रकारातील सर्वोत्कृष्ट साहित्यकृतीला हे पारितोषिक देण्यात आले आहे. तिसऱ्या वर्षातील 'जयवंत दळवी स्मृती-पुरस्कार' सर्वोत्कृष्ट विनोदी लेखनाला दिला जाणार आहे. रोख ११,१११ रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. दि. १ जानेवारी १९९५ ते दि. ३१ डिसेंबर १९९७ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या विनोदी लेखनाच्या (कोणताही वाङ्मयप्रकार) पुस्तकाची १ प्रत प्रकाशक/लेखक यांनी मॅजेस्टिक प्रकाशन, ३१६ प्रसाद चेम्बर्स, गिरगाव, मुंबई-४०० ००४ या पत्त्यावर दि. ३१ मार्च ९८ पर्यंत पाठवावी, असे आवाहन 'मॅजेस्टिक प्रकाशन'तर्फे करण्यात आले आहे.

---

**अभिरुची गौरव पुरस्कार**

बडोदा येथील 'मराठी वाङ्मय परिषदे'ने नुकत्याच घेतलेल्या विविध स्पर्धांतील विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली आहेत. काव्य, कथा आणि निबंध विभागात अनुक्रमे अरुण सावळेकर (पुणे), सौ. उषा प्र. आठवले (मुंबई) आणि विभावरी शेंबेकर (नागपूर) यांना प्रथम क्रमांक मिळाला आहे; तर 'अभिरुची गौरव पुरस्कारा'साठी गिरिजा कीर, सुरेश जयराम, अशोक बेंडखळे यांची निवड झाली आहे. काव्य विभागात दुसरा व तिसरा क्रमांक अशोक कोतवाल (जळगाव), दि. रा. देशपांडे (नागपूर), कथा विभागात श्रीकांत गोंधळेकर (अकोला), सौ. शीला घाटपांडे (पुणे) यांना अनुक्रमे दुसरा व तिसरा आणि निबंध विभागात योगेश काळे (पुणे) आणि व. ना. लुकतुके (ठाणे) यांना दुसरा व तिसरा क्रमांक मिळाला. परिषदेच्या १९९६च्या 'अभिरुची गौरव पुरस्कारा'साठी सौ. शोभा तेलंग - कविता संग्रह (इंदूर), विद्या सप्रे - कादंबरी (धारवाड), ललित लेख - गिरिजा कीर (मुंबई), शैलजा डोंगरे - कथासंग्रह (बडोदे), सुरेश जयराम - नाटक (मुंबई), अशोक बेंडखळे - चरित्रकथा (मुंबई) आणि प्र. बा. कुलकर्णी - धार्मिक विभाग (पनवेल) यांची निवड झाली आहे.

---

**जर्मन नाटककार ब्रेख्त - जन्मशताब्दी समारंभ**

सुप्रसिद्ध जर्मन नाटककार आणि कवी बर्थोल्ट ब्रेख्त यांची जन्मशताब्दी १० फेब्रुवारीपासून जगभर साजरी झाली. हे औचित्य साधून ब्रेख्तची कविता आणि नाटके समाजासमोर मांडण्याच्या उद्देशाने मुंबईतील परिवर्तनवादी सांस्कृतिक संघटनांनी एकत्र येऊन 'ब्रेख्त जन्मशताब्दी समारोह समिती' स्थापन करून या समितीतर्फे दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी एका भव्य कार्यक्रमाचे मुंबईत आयोजन केले. या कार्यक्रमात ब्रेख्तच्या नाटकांच्या अनुषंगाने राजकीय रंगभूमीविषयक चर्चासत्र, ब्रेख्तच्या निवडक कवितांचे प्रकाशन आणि वाचन, त्यांच्या नाटकाचा प्रयोग, पोस्टर प्रदर्शन, ब्रेख्तवरील चित्रपटाचे आयोजन इत्यादींचा अंतर्भाव होता. पहिल्या महायुद्धोत्तर जर्मनीतील अराजकसदृश परिस्थितीतून बर्थोल्ट ब्रेख्तच्या नाट्य प्रतिभेला स्फूर्ती मिळाली. फॅसिस्ट दडपशाहीविरुद्ध लढा देण्यासाठी त्याने रंगभूमीचा प्रभावी वापर केला असे मत प्रसिद्ध अभिनेते ए. के. हंगल यांनी त्याच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमप्रसंगी व्यक्त केले. साम्यवादी व पुरोगामी चळवळीतील योगदानाबद्दल प्र. श्री. नेरूरकर आणि डॉ. सदा कऱ्हाडे यांचा सत्कार करण्यात आला. नारायण सुर्वे यांच्या हस्ते ब्रेख्तच्या कवितांच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन झाले.

---

**'आत्मजा' कादंबरीचे प्रकाशन**

औरंगाबादच्या साहित्य सेवा प्रकाशनातर्फे मधुवंती सप्रे लिखित 'आत्मजा' या कादंबरीचे नुकतेच विलेपार्ले येथील रमाबाई परांजपे बालमंदिर सभागृहात प्रसिद्ध पत्रकार माधव गडकरी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. श्री. गडकरी कादंबरीबद्दल बोलताना म्हणाले, ''आत्मजामध्ये प्रसंग, घटना, व्यक्तिचित्रणे यांचा उत्तम मेळ साधला आहे. कादंबरीची नायिका संघर्ष करणारी आहे. कादंबरीला कोकणची पार्श्वभूमी आहे. ती समर्थपणे उभी राहिली आहे. '' लेखिका मधुवंती सप्रे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

---

**आजच्या स्पर्धेच्या युगात पुस्तकांशिवाय पर्याय नाही.**

आजच्या समाजजीवनात सर्वच क्षेत्रात वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. या काळाच्या कसोटीला तोंड देण्यासाठी ज्ञानसंग्रह करण्याशिवाय म्हणजेच पुस्तक वाचनाशिवाय पर्याय नसल्याचे मत जळगावच्या व. वा. वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर चौधरी यांनी व्यक्त केले.

पुण्याच्या 'अक्षरधारा' उपक्रमाच्या ४६व्या भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे व. वा. वाचनालयाच्या

सभागृहात आयोजन करण्यात आले होते, उद्घाटन समारोहाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. चौधरी बोलत होते. लायन्स क्लबचे शहराध्यक्ष व्ही. एस. रेणापूरकर तर प्रमुख अतिथी म्हणून कमलेश मारू, ॲड. सुशील अत्रे उपस्थित होते. हे प्रदर्शन ८फेब्रुवारीपर्यंत चालले होते. प्रदर्शनाला ग्रंथप्रेमींची प्रचंड गर्दी होती. प्रदर्शनात सुमारे २०,००० पुस्तके विषयवार मांडण्यात आली होती. ग्रंथखरेदीवर सवलतही देण्यात आली असे रमेश राठिवडेकर, शैलेश वाजा व अनिल पाटील यांनी सांगितले.

**'अभिनिवेश'ला पुरस्कार**

दि. ९, १०, ११ जानेवारी १९९८ ला पुणे येथे अकरावे अखिल भारतीय मराठी जैन साहित्य संमेलन संपन्न झाले. या प्रसंगी माजी केंद्रीय मंत्री वसंत साठे यांच्या हस्ते श्री. शांतिलाल भंडारी यांना त्यांच्या 'अभिनिवेश'या ग्रंथासाठी 'जैन सहयोग उत्कृष्ट साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**बहिणाबाई - सोपानदेव खानदेश पहिले साहित्य संमेलन**

सोपानदेव चौधरी यांच्या आसोदा (जळगाव) या जन्मगावी खानदेश साहित्य संमेलन ३ ते ५ डिसेंबर १९९७ दरम्यान रुद्रवाणीचे संपादक श्री. जीवन किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली साजरे झाले. उद्घाटन जळगावच्या महापौर सौ. सुधाताई काळे यांनी केले, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. श्री. राजा महाजन उपस्थित होते.

**आचार्य अत्रे पुरस्कार**

आचार्य प्र. के. अत्रे जन्मशताब्दी साहित्य संमेलनाच्या वेळी आचार्य अत्रे स्मृतिप्रतिष्ठानने ठेवलेला आचार्य अत्रे पुरस्कार जीवन किर्लोस्कर यांनी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आला.

**'हृदयाचं नातं' चे प्रकाशन**

३ जानेवारी ९८ रोजी वेसावे मुंबई येथे पांडुरंग तरे लिखित 'हृदयाचं नातं' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झाले. ''पांडुरंग तरेगुरुजी हे हाडाचे शिक्षक असल्यामुळे त्यांचे समाजाशी असलेले हृदयाचे नाते साध्या, सोप्या भाषेत व्यक्त करणारे आहे.'' असे कर्णिक म्हणाले. प्रमुख पाहुणे अशोक जैन म्हणाले, 'स्वातंत्र्यापूर्वीचे लिखाण हे मध्यमवर्गीय चाकोरीतील लिखाण होते, पण गेल्या काही वर्षापासून समाजाच्या विविध स्तरातून होऊ लागलेल्या लिखाणाने त्या त्या समाजाच्या आशाआकांक्षा प्रतिबिंबित होऊ लागल्या आहेत. आता कोळी समाजातूनही वैशिष्ट्यपूर्ण लिखाण होऊ लागले आहे ही समाधानाची बाब आहे.' या कथासंग्रहात प्रस्तावनाकार अशोक बेंडखळे यांनी 'स्वत:च्या



जीवनात आलेली माणसे, घेतलेले अनुभव यावर बेतलेल्या या कथा असून त्यातून आदर्शाचं, चांगल्या संस्काराचं दर्शन लेखकानं घडवलं आहे.' असे सांगितले.

**अशोक बेंडखळे यांना स्तंभलेखन पुरस्कार**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई या संस्थेतर्फे दरवर्षी साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या संस्थेतर्फे यंदा प्रथमच स्तंभलेखन क्षेत्रातील चतुरस्त्र कामगिरीबद्दल श्री. पुरुषोत्तम अस्लेकर पुरस्कृत पुरस्कार स्तंभलेखक अशोक बेंडखळे यांना जाहीर झाला आहे. बेंडखळे हे विविध नियतकालिकांमधून सातत्याने स्तंभलेखन करीत आहेत. वेगळ्या वाटा (रविवार लोकसत्ता), पडद्याआड (महाराष्ट्र टाइम्स), सर्वाधिक खपाची पुस्तके (साप्ताहिक लोकप्रभा), छंद आणि छांदिष्ट (साप्ताहिक सकाळ) ही त्यांची सदरे विशेष गाजली. आयडियल स्तंभलेखक चर्चा मंचचे ते संस्थापक सदस्य आहेत.

**वसंत वऱ्हाडपांडे स्मृती पुरस्कार श्रीधर शनवारे यांना प्रदान**

श्रीधर शनवारे यांच्या 'तळे संध्याकाळचे' या कवितासंग्रहाला विदर्भ साहित्य संघाचा 'वसंत वऱ्हाडपांडे स्मृती पुरस्कार' प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार मराठी भाषेतील सर्व वाङ्मय प्रकारांमधून विशेष लक्षणीय ठरलेल्या पुस्तकाला दिला जातो. या पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून त्याचे मानकरी शनवारे ठरलेले आहेत.

विदर्भ साहित्य संघाचा अमृत महोत्सव नुकताच नागपूरला साजरा झाला. त्यात हा पुरस्कार देण्यात आला. श्रीधर शनवारे यांच्या काव्यलेखनाला यापूर्वी केशवसुत पारितोषिक, कुसुमाग्रज पारितोषिक वगैरे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

**'वळणावरचे साकव'ला पुंडलीक पुरस्कार**

'वळणावरचे साकव' ह्या पुस्तकाला १९९७ सालचा उत्कृष्ट व्यक्तिचित्रसंग्रह म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेने डॉ. विद्याधर पुंडलिक पुरस्कार दिला. द. मा. मिरासदार ह्यांच्या अध्यक्षतेखाली लेखक डॉ. चंद्रकांत वर्तक ह्यांना पुरस्कार व सन्मानपत्र देण्यात आले.

**कलकत्ता ग्रंथ जत्रा**

कलकत्ता बुक फेअर दिनांक २८ जानेवारी ते ६ फेब्रुवारी १९९८ रोजी भरली होती. ७.५० लाख चौरस फूट जागेवर उभारलेल्या या ग्रंथजत्रेत ३५२ स्टॉल्स होते. (इंग्लंड, दक्षिण अफ्रिका, फ्रान्स, जर्मना, पेरू, चिली, पाकिस्तान, बांगलादेश इ.) १४ देशांतील प्रकाशनसंस्था त्यात सहभागी होत्या.

कलकत्ता बुक फेअरला गेल्या वर्षी अग्निदेवतेची झळ लागली, तरीही १० कोटी रुपयांची पुस्तके विकली गेली अशी माहिती या ग्रंथजत्रेचे कार्यवाह आतील आचार्य यांनी दिली.

१५ लाख ग्रंथप्रेमींनी या जत्रेला भेट दिली.

ग्रंथांतून दिसणारे ग्रेट ब्रिटनचे सांस्कृतिक व कलात्मक वैभव या विषयाला या ग्रंथजत्रेत महत्त्व देण्यात आले होते. ब्रिटिश शास्त्रज्ञ व विज्ञानलेखक रिचर्ड डॉकिन्स याच्या हस्ते या ग्रंथजत्रेचे उद्घाटन झाले.

बांगलादेशातील अनेक प्रकाशकांनी या ग्रंथजत्रेत यंदाही हजेरी लावली. बांगलादेशच्या कलात्मक परंपरेचा परिचय देणाऱ्या पुस्तकांना मोठी मागणी आहे असे बांगलादेशच्या व उच्चायुक्त कार्यालयातील प्रेस सेक्रेटरी मोहमद अबु तयेब यांनी म्हटले.

गतवर्षी लागलेल्या आगीत ४५५ स्टॉल्स भस्मसात झाल्याने अग्निशामक दलाने यावर्षी स्टॉलवर ताडपत्री टाकू नये असा निर्बंध घातला होता. परंतु यंदा अचानक पाऊस कोसळला, आणि काही स्टॉल्समधील पुस्तके भिजली. तेव्हा ताडपत्र्या पुन्हा टाकण्यात आल्या. अर्थात अशा आपत्तींना तोंड देऊनही ही जत्रा पुस्तकप्रेमी व्यक्तींना आकृष्ट करीत राहिली.

**मुंबई विद्यापीठात सिंधी साहित्याचे दालन**

मुंबई विद्यापीठाच्या कालिना विद्यानगरीमध्ये सिंधी साहित्याच्या प्रसारासाठी कार्यरत सहयोगी फाऊंडेशन कॉर्नरचे १० फेब्रुवारी रोजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाले. नाना चुडासमा हे अध्यक्षस्थानी होते. सिंधी लेखकांची दुर्मिळ पुस्तके, हस्तलिखिते, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेटस वगैरेंचे संकलन या केंद्रात करण्यात येईल असे सिंधी विभाग प्रमुख डॉ. बलदेव मतलानी यांनी सांगितले.

मराठी लेखकांची हस्तलिखिते, पत्रव्यवहार, छायाचित्रे वगैरे जतन करण्यासाठी मुंबई विद्यापीठाला असाच कोणी मराठी दाता भेटायला हवा.

**'विज्ञानशोधिका' पुस्तिका संच**

विज्ञानातील अनेक संकल्पना साध्या सोप्या भाषेत सांगणाऱ्या सचित्र पुस्तिकांचा संच पुणे येथील विज्ञानशोधिका या संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात येणार आहे. प्रा. जयंत नारळीकर, प्रा. वि. ग. भिडे, प्रा. व्ही. के. कपाही आदी शास्त्रज्ञ या प्रकल्पासाठी पुस्तिका लिहिणार आहेत.

केवळ शाळकरी मुलांनाच नव्हे, तर सर्वसामान्यांनाही विज्ञानाकडे आकर्षित करण्यासाठी हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. विज्ञानातील मूलभूत संकल्पना, घरच्या घरी करता येणारे प्रयोग, नुकतेच लागलेले शोध आदी विविध विषयांवर पुस्तिका काढण्यात येणार आहेत. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत या पुस्तिका काढल्या जाणार आहेत.

**प्रसाद मासिक सुवर्णमहोत्सव**

"आत्मज्ञानासारखे दुसरे समाधान कशातही नाही. लोकांत न्यायाने व नीतीने वागून आणि एकांतात अंतर्मुख होऊन चिंतन केले, तर आत्मज्ञान घडेल," असे मार्गदर्शन ज्येष्ठ समर्थभक्त अण्णाबुवा कालगावकर यांनी केले. 'प्रसाद' मासिक व प्रकाशन सुवर्णमहोत्सव प्रसंगी ज्येष्ठ



विचारवंत नानाजी देशमुख व ज्येष्ठ साहित्यिक राम शेवाळकर हे उपस्थित होते. या वेळी प्रसाद प्रकाशनातर्फे अकरा ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. समाजात न्याय व नीती स्थापनेसाठी प्रत्येकाने झटले पाहिजे, असे सांगून कालगावकर म्हणाले, "प्रपंचाचा पसारा कितीही पसरला तरी तो नाशवंत आहे हे विसरता कामा नये. आत्मानुभवासाठी प्रपंचाचा त्याग करायला हवा. त्याग करू तेवढा थोडाच असतो. प्रपंचाचा त्याग करणे म्हणजे संसार सोडून देणे नव्हे, तर केवळ स्वत:च्या कुटुंबापुरते न पाहता अन्य कुटुंबाचा आधार होणे होय."

**ग्रंथालय चळवळ अद्यापही सामान्यांपर्यंत पोचली नाहा - डॉ. सरोजिनी वैद्य**

"स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेल्या पन्नास वर्षांत शिक्षणाचा विस्तार वाढला असला, तरी ग्रंथालय चळवळ मात्र अजूनही सर्वसामान्यांपर्यंत खऱ्या अर्थी पोचू शकलेली नाही," असे मत राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सरोजिनी वैद्य यांना व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिराच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या वेळी वेगवेगळ्या क्षेत्रांतील तीन मान्यवरांना पुरस्कार देण्यात आले. अनंतराव जोशी (ज्ञानकोशकार केतकर पुरस्कार), डॉ. अनिल अवचट (सामाजिक कार्यकर्ता तपस्वी पुरस्कार) डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर (संतसाहित्य पुरस्कार) यांचा डॉ. वैद्य यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

श्री. दीक्षित यांनी सर्वांचे स्वागत केले. सहकार्यवाह बा. शं. येवले यांनी कार्यक्रमासाठी मान्यवरांनी पाठविलेल्या शुभेच्छा संदेशांचे वाचन केले. कार्यवाह डॉ. पुष्पा लिमये यांनी परिचय करून दिला. उपाध्यक्ष ॲड. भा. ग. ठकार यांनी आभार मानले.

**शीला गुजराल - काव्यसंग्रहाचे प्रकाशन**

पंतप्रधान आय. के. गुजराल यांच्या पत्नी शीला गुजराल यांच्या 'कॅनव्हास ऑफ लाइफ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन कोनार्क या प्रसिद्ध प्रकाशन संस्थेतर्फे करण्यात आले. पंजाबी, हिंदी आणि इंग्रजी अशा तीन भाषांत शीला गुजराल कविता करतात. वर्ल्ड ॲकॅडमी ऑफ आर्ट अँड कल्चरने त्यांना नुकतीच डी.लिट ही सन्माननीय पदवी दिली. जपानच्या साका युनिव्हर्सिटीने शीला गुजराल यांना काव्यक्षेत्रातील योगदानाबद्दल आपला सर्वोच्च सन्मान प्रदान केला. पुत्रजन्म, नवविवाहित सून घरात येण्याची उत्सुकता, मातृप्रेम, जीवनातील आनंदाचे क्षण यावर त्यांच्या काव्यात भर दिला गेला आहे. भारतीय स्त्रीच्या मनोभूमिकेचा उत्कट आविष्कार त्या करतात असे एका समीक्षकाने म्हटले आहे.

**दहिसर येथे ग्रंथप्रदर्शन**

महाराष्ट्र कलाक्रीडा व सांस्कृतिक मंडळ (दहिसर) आणि राजहंस प्रकाशन यांच्या सहकार्याने दहिसर येथे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. सुरेश ठाकूर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले.

### कथालेखन पुरस्कार

मराठी बालकुमार साहित्य संमेलन, पुणे या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या राधाबाई गाडगीळ कथालेखन स्पर्धेत पुढील स्पर्धकांनी बक्षीसे मिळवली.

१) देविका देशपांडे (ज्ञानप्रबोधिनी, पुणे)

२) जिज्ञासा मुळेकर (ज्ञानप्रबोधिनी, पुणे)

३) संदेश आंबेकर (वसंतदादा पाटील, विद्यानिकेतन)

उत्तेजनार्थ – पिनाकिन कर्वे, कल्पना गिरजे, दीप्ती गायकवाड, नीरजा गोखले

### मेहरुन्निसा दलवाईंना आगरकर पुरस्कार

लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले या संस्थेचा समाजसुधारक आगरकर पुरस्कार ८ मार्च १९९८ रोजी मेहरुन्निसा दलवाई यांना प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे. यापूर्वी हा पुरस्कार स्त्रीवादी कार्यकर्त्या विद्या बाळ आणि फासेपारधी जमातीत काम करणारे कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांना लाभला होता.

### दुर्गा भागवत - ८९व्या वर्षात पदार्पण

प्रसिद्ध लेखिका दुर्गा भागवत यांनी १० फेब्रुवारी १९९८ रोजी ८९व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्ताने देवानंद भुवड यांची घेतलेल्या मुलाखतीत त्यांनी म्हटले, ''मी लेखिका म्हणून अजून अतृप्त आहे. आताचे काही लेखक लिहितात त्यासारखे मी लिहू शकत नाही असे माझे प्रामाणिक मत आहे. ज्याचं क्रेडिट त्याला द्यावं आणि आपण मोकळं व्हावं. मात्र पारितोषिके हा रोग झालेला आहे. मी ज्ञानपीठ, पद्मश्री वगैरे पुरस्कार सपशेल नाकारले. खांडेकरांनंतर ज्ञानपीठ पुरस्कार मला देत होते. हिंदी व गुजराती भाषेची माणसं आली होती - पण मी तो स्वीकारला नाही. पद्मश्री - पद्मभूषणसाठी सेक्रेटरियटमधून फोन आले, पण मी ठाम नकार दिला. मात्र ही माझी थोरवी म्हणून सांगत नाही, तर दुसऱ्याचा पैसा घेऊन मी आधीन होईन म्हणून मी असे केले. काही पुरस्कार मी घेतले पण नंतर त्याचा मला पश्चाताप झाला. तेव्हा लोकांनी मला क्षमा करावी असे मी म्हटले. पुरस्कारांनी आपली माणुसकी विकली जाते.''

– (सामना, दि. ८-२-१९९८)

### मराठी चित्रपटाची भाषा

गडहिंग्लज येथे सत्त्वपरीक्षा या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच झाले. रमेश साळगावकर हे त्याचे दिग्दर्शक. कथालेखक प्रताप गंगावणे यांनी तमाशाच्या पार्श्वभूमीवरील ही कथा लिहिली आहे. अर्थात दिग्दर्शक साळगावकर यांनी म्हटलेय की, ''ही कथा चर्चेतून आकाराला आलेली आहे. कुणा एकाची ती नव्हे.'' पत्रकार शेखर देशमुख यांनी गंगावणे यांना म्हटले, ''आजच्या मराठी चित्रपटांना स्वत:ची अशी भाषा राहिलेली नाही. ती धड ग्रामीण नाही की शहरी नाही. एकाच संवादातली दोन वाक्यं सर्रास ग्रामीण आणि शहरी ढंगानं बोलली जातात. हे जे काही चाललंय त्याला जबाबदार कोण?'' त्यावर गंगावणे यांनी उत्तर दिले, ''हा दोष लेखकाचा नव्हे, दिग्दर्शकाचा आहे.''

–(महाराष्ट्र टाइम्स, दि. ३१-१-१९९८)



### पुरस्कार

फाय फाउंडेशन, इचलकरंजी या संस्थेने यावर्षी साहित्यनिर्मितीबद्दल प्रसिद्ध मराठी लेखक व. पु. काळे आणि व्यंकटेश माडगूळकर यांना रुपये २५ हजारांचे पुरस्कार दिले. आपल्याकडे कामाला येणाऱ्या मोलकरणीच्या घरावर छप्पर घालण्यासाठी पुरस्काराची रक्कम देणार असल्याची घोषणा व. पु. काळे यांनी यावेळी केली. इंग्लिश लेखिका शोभा डे यांचीही पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

### श्रद्धांजली - अरुण मुझुमदार

मुंबईतील ग्रंथालीचे एक कार्यकर्ते, सामवेद या वाङ्‌मयीन व्यासपीठाचे प्रवर्तक साहित्यप्रेमी चार्टर्ड अकौन्टट अरुण विश्वनाथ मुझुमदार यांचे दि. ३ फेब्रुवारी १९९८ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे वय ५५ वर्षे होते. संगीत-साहित्यक्षेत्रात त्यांना रस होता. त्यांच्यामागे पत्नी लेखिका वासंती मुझुमदार व कन्या सौ. श्रुती पंडित आहेत. अरुण मुझुमदार यांनी ग्रंथालीसाठी कुमार गंधर्व यांची बारा वर्षापूर्वी सप्रयोग व्याख्याने आयोजित केली होती. 'कास्प' वगैरे समाजसेवी संस्थांच्या कार्यातही त्यांचा सहभाग होता.

*१३व्या वर्ल्ड बुक फेअरमध्ये*
*मा. किरण बेदी व*
*सरोज वसिष्ठ यांनी*
*मेहता पब्लिशिंग हाऊसच्या*
*स्टॉलला भेट दिली.*

# पुस्तक परिचय

## एक वाङ्मयीन प्रकार म्हणून आत्मचरित्राचा घेतलेला विविधांगी वेध

# आत्मचरित्र मीमांसा

'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकाराचे दालन गेल्या काही वर्षात (१९७० नंतर) विशेष प्रकर्षाने लक्ष वेधून घेत आहे. कथाकादंबऱ्यांच्या पेक्षाही आत्मचरित्रांचा खप अधिक होत आहे, आणि समाजाच्या विविध थरांतील स्त्रीपुरुष आपल्या जीवनातील यशापयशाचे आणि रागलोभाचे क्षण जमेल तसे शब्दबद्ध करून वाचकांशी संवाद साधायला उत्सुक आहेत.

विद्यापीठ पातळीवरच्या अभ्यासक्रमातही आत्मचरित्रात्मक लेखनाची दखल घेतली जात असून एम. फिल, पीएच.डी. यांच्यासाठी अनेक तरुण अभ्यासक आत्मचरित्राची निवड करीत आहेत. ''परंतु अशा अभ्यासात आत्मचरित्रातील आशयावर भर देऊन, त्याच्या वाङ्मयीन रूपाकडे दुर्लक्ष केले जाते'' हे लक्षात आल्यामुळे पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे माजी प्रमुख प्रा. आनंद यादव यांनी 'आत्मचरित्रमीमांसा' हे पुस्तक लिहून अभ्यासकांची अडचण दूर केली आहे.

आनंद यादव यांनी स्वत:चे आत्मचरित्र चार खंडांत लिहिले आहें; पण त्याला 'आत्मचरित्रात्मक कादंबरी'चे स्वरूप देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ते स्वत: आत्मचरित्र हा कादंबरीइतकाच महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे असे मानतात; आणि त्याचे वेगळेपण दाखवू पाहतात. त्यामुळे या पुस्तकातील लेखांना महत्त्व येते.

१८४५ ते १९४५ या शंभर वर्षात धार्मिक, सामाजिक व राजकीय प्रबोधनाच्या प्रभावामुळे लेखनही ध्येयवादी व बोधवादी, स्वातंत्र्यप्रेमाने भारलेले असे होत राहिले. चरित्रे-आत्मचरित्रेही त्या दृष्टीने लिहिली गेली. १८७० नंतर इंग्रजीतील अनेक मान्यवर व्यक्तींची आत्मचरित्रे मराठीत भाषांतरित होऊन वाचकांपुढे आली. १९२० नंतर साहित्यात रोमँटिसिझम



व रंजनवाद यांची लाट आली. बोधवादी व प्रबोधनवादी आशयाशिवायही साहित्याला अस्तित्व असू शकते याची जाणीव लोकांना होऊ लागली. आत्मचरित्र-चरित्र या प्रकाराबाबतही त्या जाणीवेमुळे नवी दृष्टी लाभली. १९५०नंतर स्वातंत्र्योत्तर काळात वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींना आत्मचरित्रे लिहून आपल्या कार्यकर्तृत्वाबद्दल लोकांना माहिती देण्याची निकड वाटू लागली. आपल्या कार्याची नोंद व्हावी यासाठी आपल्याइतके माहितीपूर्ण दुसरे कोण लिहू शकणार या भावनेने अनेकांनी आत्मवृत्तात्मक लेखन केले.

१९७० ते ९५ या काळात आत्मचरित्राला एक वाङ्मयीन प्रकार म्हणून खरा बहर आला. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळीचा भाग म्हणून ती लिहिली गेली, तशीच वाङ्मयीन भूमिकेतूनही लिहिली गेली. सांगत्ये ऐका, उपरा, बलुतं, मला उद्ध्वस्त व्हायचंय, स्नेहांकिता, आहे मनोहर तरी, बंध-अनुबंध, उचल्या यासारख्या पुस्तकांद्वारे दलित, स्त्रिया, अभिनेत्री, कार्यकर्त्या वगैरेंनी आपल्या अनुभवांबरोबर आपल्या रागलोभाचीही मोकळेपणाने चर्चा केली; आणि त्यांनी जनमानसाला मोहिनी घातली.

आनंद यादव यांनी स्वत:ही आत्मचरित्राचा विस्तृत पट मांडण्यासाठी कादंबरीचा आकृतिबंध स्वीकारण्याचा घाट घातला. त्यामुळे या वाङ्मयप्रकारावर समीक्षात्मक पुस्तक लिहिण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्यच म्हणावा लागेल.

'आत्मचरित्र' ह्या शब्दामागची संकल्पना, लेखनामागच्या प्रेरणा, आत्मचरित्राचे प्रकार, आत्मचरित्राचा विषय, लेखनाची पूर्वतयारी, आत्मचरित्र लेखनातील संभाव्य दोष, साहित्यिकांची आत्मचरित्रे, आत्मचरित्र आणि कादंबरी, आत्मचरित्रकाराचे लेखकीय गुणधर्म, आत्मचरित्राचे वाचन, आत्मचरित्राची मूल्यात्मकता आणि आत्मचरित्र - एक जीवघेणा साहित्यप्रकार अशा बारा प्रकरणात आनंद यादव यांनी या विषयाची मांडणी केली आहे.

स्वत:च स्वत:च्या जीवनाचा काढलेला आलेख, ''मी माणूस या नात्याने आजवर जी वाटचाल केली, त्या वाटचालीतील सुखदु:खे, आशाआकांक्षा, विकास-विस्तार, भाव-सत्ये, कृतिकर्मे, यशापयश, धडपड यांचा 'मी' केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख'' - म्हणजे आत्मचरित्र. 'चरित्र' याबरोबर 'चारित्र्य' हा शब्दही अटळपणे येतो. त्याचा नैतिक संदर्भही त्याला चिकटतो. त्यामुळे इंग्रजीतील ऑटोबायोग्राफी या शब्दापेक्षा आपला आत्मचरित्र हा शब्द अधिक व्यापक आहे असे यादव मानतात. पाश्चात्य आत्मचरित्रे 'कन्फेशन'च्या धार्मिक कल्पनेमुळे प्रमादांची कबुली देण्यात, दोषांची चर्चा करण्यात जास्त रस घेतात. भारतीय व्यक्ती घर, कुटुंब, समाज, संस्कृती, ध्येय, देश यासाठी केलेल्या कार्यावर भर देतात, दोषांची चर्चा बहुधा टाळतात. आत्मसमर्थन, आत्मगौरव हा भाव त्यात जास्त दिसतो.

आत्मचरित्राच्या प्रेरणांमध्ये आत्मप्रतिमेच्या जाणिवेची आत्मशोध, आत्मपूजा, आत्मसमर्थन, आत्मपरीक्षण इ. अंगे महत्त्वाची ठरतात. आत्माविष्काराची प्रेरणाही प्रबळ असते.

आत्मचरित्राचे प्रकार - सार्वजनिक क्षेत्रात काम करणारे उद्योजक, अधिकारी, व्यापारी, कारखानदार, कार्यकर्ते यांची आत्मचरित्रे आणि वैयक्तिक जीवन जगणाऱ्या प्रापंचिक व्यक्तींनी

लिहिलेली - आत्मचरित्रे असे विल्यम्स स्पेंजमनने सुचवले आहेत. तत्वज्ञानात्मक, इतिहासात्मक व काव्यात्मक असे प्रकारही तो मानतो. (पृष्ठ ३२)

श्यामची आई, कोणा एकाची भ्रमणगाथा यासारखी पुस्तके ही साहित्यरूपात्मक आत्मचरित्रात्मकच आहेत. साहित्यिक कथा-कादंबरी-काव्य यातून आपल्या जीवनातील घटना, प्रसंग, अनुभव नि:संकोचपणे मांडतो. - मानसशास्त्रीय दृष्ट्या हा त्याच्या 'मी'चाच मुक्त आविष्कार असतो असे यादव सुचवतात. (३४). अर्थात साहित्यरूपात्मक आत्मचरित्र फक्त ललित साहित्यिकांनाच लिहिता येणे शक्य असते. (३७). मात्र हा अत्यंत फसवा वाङ्मय प्रकार आहे (३९). काल्पनिक घटना प्रसंग घालून ज्या आत्मपर कादंबऱ्या खुलवल्या जातात, त्यांना साहित्यरूपात्मक आत्मचरित्र म्हणजे अयोग्य ठरते. (३९). साहित्यरूपात्मक आत्मचरित्रांचा हेतू कलात्मक अनुभव, सौंदर्यानुभव देणे हा असतो. (४१). आत्मचरित्राला जवळचे असे साहित्यप्रकार म्हणून दैनंदिनी, स्मृतिचित्रे, संस्मरणे, खाजगी पत्रे, मुलाखती, कन्फेशन्स यांचा निर्देश करता येतो. (४७). स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची, समाजातील स्व-अस्तित्वाची, अस्तित्वाच्या अर्थपूर्णत्वाची, कर्तृत्वाची स्पष्ट जाणीव होते, तेव्हाच आत्मचरित्र लिहिणे योग्य. सामान्य व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहू नयेत. ती वाचनीय असली तरी प्राथमिक जिज्ञासापूर्ती व रंजन यापलीकडे जात नाहीत. (५४). चांगली आत्मचरित्रे लिहिण्यासाठी पूर्वतयारी करावी लागते. ती मानसिक, बौद्धिक असते.

प्रत्यक्षात जीवन जगणारा मी जोवर बौद्धिक पातळीवर स्वत:पासून अलग होऊन प्रत्यक्षात जगलेल्या मीकडे तटस्थपणे पाहू शकत नाही तोवर उत्तम आत्मचरित्राची निर्मिती होणे अशक्य असते. ही प्रक्रिया नीट झाली नसेल त्यांची आत्मचरित्रे दोषपूर्ण, एकांगी व सामान्य दर्जाची ठरतात. अशी अर्धकच्ची प्रक्रिया झालेली आत्मचरित्रे गुणदोषयुक्त- दुसऱ्या श्रेणीची ठरतात. ही प्रक्रिया पूर्ण झालेल्या व्यक्तींची आत्मचरित्रे दर्जेदार, कलात्मक असतात. (६६).

प्रा. यादव आत्मचरित्रात काय काय यावे याबद्दलही काही मुद्दे सांगतात.

१) आत्मचरित्र - नायकाचा जन्म, बालपण
२) कौटुंबिक पार्श्वभूमी - घराणे, 'मी'ला मिळालेला वारसा, गुणदोष
३) मी चे तारुण्य, स्वभाव, कर्तृत्व, महत्त्वाकांक्षा
४) कुटुंब, शिक्षण, गुरु, मित्र, वाचन व समाज यांचे संस्कार
५) प्रौढपणाचा काळ, नोकरी, व्यवसाय, कार्य
६) वृद्धापकाळ - शेवटचा टप्पा, जीवनविषयक चिंतन

या सर्वांविषयी व्यवस्थित माहिती, नोंदी, टिपणे करून जे सांगायचे त्याची निवड केल्यास आत्मचरित्रलेखन सुकर जाते. (पृष्ठ ७६).

आंद्रे मोर्वा याने 'ॲस्पेक्टस ऑफ बॉयोग्राफी' मध्ये आत्मचरित्रलेखनातील काही धोके वा दोष यांचा निर्देश केला आहे. बालपणातील घटनांची अपुरी माहिती व विस्मृती, घटनांची निवड करताना दाखवलेली एकांगी - पूर्वग्रहदूषित दृष्टी, असमाधानकारक - अडचणीच्या



घटना टाळण्याची प्रवृत्ती, नाट्यपूर्ण शैलीतून अनिष्ट घटनांचे रूप पालटण्याची चलाखी, अपघाताने घडलेल्या वीरश्रीयुक्त घटनांचे श्रेय लाटणे, आप्त-मित्रांना सांभाळून घेण्यासाठी वस्तुस्थितीचा विपर्यास करणे. या सहा दोषांचे निराकरण करताना प्रा. नाईक यांनी पुढे केलेले मुद्देही यादव नोंदवतात. मतभेद - संघर्ष - वाद याबद्दल लिहिताना अडचणी उभ्या राहतात. त्याबाबतही नेमकी भूमिका कशी घ्यावी हे यादव सांगतात. (८८-८९).

"आपल्याला जीवनात आलेले अनुभव आपण कथा-कादंबरी-नाटक-काव्य वगैरे स्वरूपात मांडतो; मग आपल्याला स्वतंत्र आत्मचरित्र लिहिण्याची गरजच काय?" असा प्रश्न अनेक साहित्यिकाराना पडतो. यादव यांना हा प्रश्न भाबडेपणाचा वाटतो. अडाणीपणाचा वाटतो. आपल्या प्रत्यक्ष जीवनातील घटना जेव्हा साहित्यनिर्मितीत वापरल्या जातात तेव्हा त्या मूलद्रव्याचे रूपान्तर होऊन, त्यांना नवे संदर्भ प्राप्त झालेले असतात. प्रत्यक्ष जीवनातील घटना प्रसंग आणि त्यावर आधारित साहित्यकृती या दोन्ही गोष्टी भिन्न भिन्न असतात; तेव्हा "माझ्या आत्मचरित्रातील घटना माझ्या साहित्यकृतीत आलेल्या आहेत" असे म्हणणे ही एक घोडचूक असते" असे यादव यांचे प्रतिपादन आहे. (९८).

शैलीदार मांडणी व संपन्न भाषा ह्या बाह्यांगाच्या गोष्टी असतात; स्वजीवनाची सर्वांगीण व सखोल जाण नसेल तर यशस्वी आत्मचरित्र लिहिणे अवघड जाते असा इशाराही ते साहित्यिकांना मुद्दाम देतात (९९).

घोडचूक हा यादवांचा आवडता शब्द दिसतो. 'आत्मचरित्रात्मक कादंबरी' हा शब्द 'आत्मचरित्रा'साठी वापरणे ही घोडचूक आहे, फारतर कलात्मक आत्मचरित्र असा शब्दप्रयोग करावा एवढी सूट ते देतात. (१०८).

सामान्य माणसाच्या जीवनावर एखादा कादंबरीकार असामान्य कादंबरी लिहू शकेल, पण सामान्य माणसाच्या जीवनाचे आत्मचरित्र मात्र असामान्य होऊ शकणार नाही; ते सामान्यच राहणार असेही यादव सुचवतात. (१११). या नियमाला स्मृतिचित्रे हा अपवाद असल्याचे सांगताना ते लिहितात : 'पण एखादा सामान्य जीवन जगणारा माणूस लेखन करताना मात्र असामान्य असू शकतो. त्याचे आत्मचरित्र असामान्य होऊ शकते." (१११).

आत्मचरित्रकाराच्या अंगी काही वाङ्मयीन गुण असावे लागतात. काही दोष टाळावे लागतात. अनेक आत्मचरित्रे अस्ताव्यस्त, दिशाहीन, कंटाळवाणी, तारतम्यहीन वाटतात. उपलब्ध सामग्रीची निवड तटस्थपणे, अलिप्तपणे, काटेकोरपणे करावी लागते. मात्र अतिअलिप्तता वा अतितटस्थता हा दोष ठरतो. काही महत्त्वाच्या घटना आत्मचरित्रात वगळल्या गेल्या तर ते अपुरे, अप्रामाणिक ठरते. आनंद यादव ना. सी. फ़डके यांनी 'माझं जीवन - एक कादंबरी' मध्ये आपल्या पहिल्या पत्नीबरोबरच्या संसाराविषयी लिहिण्याचे टाळले आहे. त्यामुळे आत्मचरित्रकार म्हणून ना. सी. फडके त्यांना अप्रामाणिक वाटतात. (११८). आचार्य अत्रे यांनीही 'कऱ्हेचे पाणी'मध्ये वनमाला प्रकरण पूर्णतया वगळलेले आहे हेही येथे नमूद करावेसे वाटते. स्वभावधर्म व घडामोडी यांची संगती लावणारी अंतर्वेध शक्ती ही बौद्धिक व तार्किक असते; ती जीवनाचा

अन्वयार्थ लावू शकते, आत्मचरित्राचा आकृतिबंध त्यातून जाणवू लागतो. त्यानंतर आत्मचरित्रलेखन झाले तर ते वेधक होऊ शकते. (१२०).

वाचकांना आत्मचरित्रे वाचावीशी का वाटतात? ती वाचताना काय अपेक्षा असाव्या? काय पहावे? याबद्दलही काही पथ्ये पाळणे जरूर आहे असे यादव मानतात. आत्मचरित्रे ही खोटी असतात अशा अविश्वासाच्या भावनेने वाचायला घेतली तर पदोपदी संशय, शंका येऊ लागतात. पूर्वग्रहामुळे मग त्यांच्याशी तादात्म्य साधता येत नाही. आत्मचरित्र हे खरेखोटे आहे की प्रत्ययकारक आहे असाही प्रश्न पडू शकतो. आत्मचरित्रे अनेकदा अपुरी असतात; अपुरी माहिती देतात, पण ती तेवढ्याने तद्दन खोटी असतात असे म्हणणे इष्ट नाही. (१२९).

आत्मचरित्रातील विश्व हे प्रत्यक्षातले असल्याने ते जास्त अस्सल, विश्वासार्ह वाटते. परंतु कादंबरीचे वाचन हे वाचकाला अधिक समृद्ध करते; कारण कादंबरीत प्रतिभावंताने केलेले जीवनाचे व्यापक आकलन शब्दबद्ध झालेले असते असाही विचार यादव मांडतात. (१३१). मात्र कादंबरीतील अनुभव हे आत्मचरित्राच्या तुलनेने जास्त भेदक-समृद्ध-मूलगामी, अस्सल असतात असे सरधोपटपणे म्हणणेही अयोग्य ठरेल हेही ते मान्य करतात. (१३२).

आत्मचरित्राच्या समीक्षेच्या वेळी कादंबरी संदर्भातील वाङ्मयीन मूल्ये वापरता येणार नाहीत; त्यासाठी सामाजिक व अन्य मूल्येच अधिक उपयुक्त ठरतात. असेही म्हणायला हरकत नाही. (१३८).

आत्मचरित्राचा नायक आणि आत्मचरित्रकार यांच्यातील अंतर्गत द्वंद्वामुळे आत्मचरित्राची लेखनप्रक्रिया एका ताणातून वाटचाल करत जाते. त्या ताणामुळे हा एक जीवघेणा लेखनप्रयास ठरतो. 'ज्ञाता मी' व 'भौतिक मी' यात पर्याप्त अंतर राहिले तर आत्मचरित्र प्रांजल व विश्वासार्ह होणे सुलभ ठरते. उच्च दर्जाचे आत्मचरित्र कधी लिहिले जाते? असाही प्रश्न ते विचारात घेतात.

आनंद यादव यांना वाटते की, समाजाच्या विविध उपाधींपासून बौद्धिक दृष्ट्या मुक्त होऊन, तसेच आजवर जगलेल्या भौतिक मी पासूनही मनाने मुक्त होऊन वस्तुनिष्ठ विचार करण्याची शुद्ध आत्मिक शक्ती ज्यांच्यात असेल, तेच उच्च दर्जाचे आत्मचरित्र लिहू शकतील. (१४६). अशा उच्च दर्जाचे आत्मचरित्र वाचायला त्याच तोलामोलाची शुद्ध आत्मिक शक्ती जागृत झालेले वाचकही लागतील. तोपर्यंत जी काही बरी वाईट आत्मचरित्रे लिहिली जात आहेत ती सामान्य वाचकांनी डोक्याला फारसा त्रास न देता आणि वाङ्मयीन व अन्य मूल्यांची विशेष फिकीर न करता वाचत राहणेच इष्ट ठरेल. आपले जीवनानुभव व इतरांचे जीवनानुभव यांचा कळतनकळत तुलनात्मक मेळ घालून आपल्या आयुष्याचा अन्वयार्थ लावण्यासाठी जमेल तेवढी इतरांची मदत घेणे सोयीचे असते. आपण या जगात काही काळ राहून गेलो - जमेल तसे जगलो याचा पुरावा पुस्तकाच्या रूपात छापील शब्दात कुठेतरी मागे राहावा एवढीच भावना अनेकांना आत्मचरित्रात्मक लेखनाला प्रेरित करीत असते. एक वाङ्मयप्रकार म्हणून त्याकडे लक्ष देण्याची गरज समीक्षकांना किंवा अन्य कोणाला वाटली तर वाटली; बहुसंख्य लोकांना आत्माविष्काराची व आत्मप्रकटीकरणाची उर्मी असते, ती या प्रकारच्या लेखनाने भागते एवढेच!

आनंद यादव यांच्या या लेखनाने वाङ्मयीन मूल्ये असणाऱ्या आत्मचरित्रांचे लेखन अधिक व्हावे ही जाणीव संबंधितांना होणे सुलभ ठरेल.

*—शंकर सारडा*

**आत्मचरित्र मीमांसा, पृष्ठे १४८, नव्वद रुपये**



## लघुनिबंधाच्या विकासाचा अभ्यासपूर्ण आढावा

# मराठी लघुनिबंधाचा इतिहास

मराठीत गद्य वाङ्मयाचे विविध प्रकार प्राय: इंग्रजी वाङ्मयाच्या अभ्यासातून आणि अनुकरणातून आलेले आहेत. लघुनिबंध हा साहित्यप्रकार तर या शतकाच्या दुसऱ्या चतुर्थकातच अवतीर्ण होऊन विकसित झाला. अशा या आधुनिक वाङ्मयप्रकाराच्या सुमारे साठ वर्षांच्या काळातील विकासाचा आढावा घेणारे हे एक छोटेखानी पुस्तक आहे.

पहिल्या प्रकरणात लघुनिबंध या प्रकाराची इंग्रजी वाङ्मयातील पूर्वपीठिका अत्यंत संक्षिप्त स्वरूपात सांगितली आहे. वैचारिकतेला प्राधान्य देणारा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य देणारा आणि दोहोंचा समन्वय साधून ललित शैलीत विचार मांडणारा - असे तीन प्रमुख निबंधप्रकार इंग्रजीत विकसित झाले. त्यापैकी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाला प्राधान्य देणाऱ्या 'पर्सनल-एसे' या प्रकारातून मराठी लघुनिबंध आला, असे सामान्यत: मानले जाते. फडके - खांडेकर या बिनीच्या लघुनिबंधकारांनीही हे मत मान्य केले आहे, हे नमूद करून वि. बा. आंबेकर इत्यादींनी केलेल्या पूरक विवेचनाचाही यादवांनी येथे समावेश केला आहे. मराठीत लघुनिबंध हा प्रकार आयात होऊन रुजण्यासाठी पूर्वीच्या निबंधकारांनी अनुकूल भूमी निर्माण केली होती. चिपळूणकर, परांजपे, कोल्हटकर, केळकर इत्यादी शैलीदार लेखकांच्या निबंधांतील लालित्यगुणांनी फडक्यांच्या 'गुजगोष्टी'साठी पोषक मराठीत निर्माण करून ठेवली होती, ह्वे यादवांनी पुनश्च विशेषत्वाने मांडले आहे. तसेच ना. सी. फडक्यांच्या आरंभीच्या 'गुजगोष्टी'चे मांडणीच्या दृष्टीने न. चिं. केळकरांच्या निबंधांशी नाते आहे, हीही गोष्ट निदर्शनास आणली आहे.

फडक्यांनी लघुनिबंधांचे चार-पाच संग्रह प्रसिद्ध करून या नवीन गद्यवाङ्मयप्रकाराला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पण त्यांच्या आरंभीच्या गुजगोष्टींचे स्वरूप पूर्णत: लघुनिबंधाचे नव्हते. १९३१नंतरचे त्यांचे लघुनिबंध हे यथार्थतया लघुनिबंध मानता येतील असे आहेत, असा अभिप्राय नमूद करून फडक्यांच्या लघुनिबंधांचे गुणविशेष आणि मर्यादा यांचेही विवरण यादवांनी थोडक्यात केले आहे. सौंदर्यदृष्टीने जीवनाची आस्वाद घेण्याची त्यांची वृत्ती, मांडणीतील आकर्षकता, तांत्रिक सफाई आदी गुणांमुळे त्यांचे लघुनिबंध चटकदार आणि वाचनीय ठरले. पण वृत्तीची अंतर्मुखता, मन:पूर्वकता, तन्मयता या गुणांचे दर्शन त्यांच्या थोड्याच लघुनिबंधातून घडते. उच्च दर्जाची उत्कटता, झोकून देण्याची वृत्ती, अनुभूतीची सूक्ष्मता वा झेप कोठेच दिसत नाही. सामाजिकतेची जाणीव नाही, तज्जन्य चिंतनशीलताही नाही.

त्याच काळात लघुनिबंध लिहू लागलेल्या खांडेकरांच्या लेखनातून मात्र त्यांचे सखोल, व्यापक, विपुल आणि सूक्ष्म चिंतन सुजाणपणे प्रकट झालेले दिसते. कल्पकता, भाषेचे अलंकरण, शाब्दिक कोट्या आणि चमकदार सुभाषितवजा वाक्ये हे त्यांच्या निबंधांचे आकर्षक गुण. पण त्याहीपेक्षा विविध अनुभव आणि संस्कार यांनी संपन्न असलेल्या मनाची विकसनशील आणि सहृदय अशी सामाजिक संवेदनशीलता त्यातून प्रकट झाली. तेच त्यांच्या लघुनिबंधांचे आंतरिक सामर्थ्य होते. त्यांचा लघुनिबंध हा त्या काळातील ध्येयवादी व सुसंस्कृत मराठी मनाचा मराठी आविष्कार वाटतो, हा यादवांचा अभिप्राय मार्मिक आहे.

फडके-खांडेकरांच्या पाठोपाठ लघुनिबंध लेखन सुरू करून अनंत काणेकरांनी आपला स्वतंत्र व प्रभावी ठसा उमटविला. सामाजिक विषयावरील पुरोगामी स्वरूपाचा विचार या जीवनदृष्टी पुढे मांडताना विनोद, मिस्किलपणा, मानवी स्वभावातील विविध विसंगती आणि बारकावे यांचा मार्मिक उपयोग करून प्रसन्न, नाट्यपूर्ण व खेळकर मांडणी करण्याचे एक नवे तंत्र त्यांनी निर्माण केले. त्यामुळे त्यांचे लघुनिबंध आटोपशीर, चटकदार आणि तरीही कसदार झाले.

मराठी लघुनिबंधाची मूलभूत चौकट या तीन लेखकांनीच प्राय: निर्माण केली आणि नंतर त्यांचे अनुकरण करणारे अनेक लेखक निर्माण झाले. त्यापैकी गं. भा. निरंतर, कुसुमावती देशपांडे, ना. मा. संत यांचे लेखन विशेष लक्षणीय असल्याने त्यांच्या निबंधांचे विवेचन यादवांनी केले आहे.

स्थूलमानाने स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराची वाढ खुंटली आणि त्याचा एक साचा बनू लागला. नवनवी सौंदर्ये प्रकट करण्याची त्याची शक्ती मंदावली, असे वा. ल. कुलकर्णी यांचे मत नमूद करून या काळाच्या अखेरीस लघुनिबंधाला नवे वळण देणाऱ्या इरावती कर्वे यांच्या लेखनाचे स्वरूप यादवांनी स्पष्ट केले आहे. स्वयंपाक घरातील चुलीपासून वैश्विक मानवसंस्कृतीपर्यंत विविध विषयांतील व व्यापक क्षेत्रांतील अनुभव या व्यासंगी स्त्रीच्या लेखणीने अत्यंत संवेदनाक्षमतेने आणि अकृत्रिम पण समर्थ भाषेत टिपले आहेत. त्यामुळे



त्यांच्या निबंधांना नवे तेज आणि कसदारपणा प्राप्त झाला. इरावती कर्वे यांच्या सहज पण आशयसंपन्न लेखनामुळे लघुनिबंध कलावाद आणि तंत्रनिष्ठा यांच्या प्रभावातून बाहेर पडून विशाल आणि सखोल अनुभवांना सहजपणे सामोरे जाण्याइतका समर्थ झाला, अशा अर्थाचा अभिप्राय यादवांनी नोंदविला आहे.

या नव्या सामर्थ्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात हा निबंध आपल्या साचेबंद चाकोरीतून बाहेर पडून विविध अंगांनी विकसित झाला आणि त्याने विविध रूपे धारण केली. न. वि. गाडगीळ यांनी आपल्या समृद्ध राजकीय जीवनातील विविध अनुभव तटस्थ वृत्तीने आणि मिस्किलपणाने प्रकट केले. पाडगावकरांनी विविध भाववृत्ती काव्यमय व प्रतिमायुक्त भाषेत आविष्कृत केल्या. श्रीनिवास कुलकर्णी यांच्या तीव्र संवेदनशील व काव्यात्मवृत्तीने लघुनिबंधाला एक वेगळे अनन्यसाधारण व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले. मधुकर केचे, विजय तेंडुलकर, व्यंकटेश माडगूळकर, सरोजिनी वैद्य, प्रभाकर पाध्ये, आनंद यादव, माधव आचवल अशा अनेक प्रसिद्ध लेखकांच्या विविध प्रकारच्या लेखनातून लघुनिबंधाचे मूळचे रूपच पालटून ललित गद्याचे नवनवे प्रकार जन्माला येत गेले. या सर्वांच्या लेखनाचे विशेष यादवांनी कमीअधिक तपशील देऊन विशद केले आहेत. पण या निबंध प्रकारावर सर्वाधिक मोठा ठसा उमटविणाऱ्या गो. वि. करंदीकर आणि दुर्गा भागवत या दोन प्रतिभासंपन्न लेखकांच्या कामगिरीचे विशेष विवेचन केले आहे.

या सर्व प्रतिभाशाली लेखकांमुळे मराठी निबंधाबद्दलचा हा विचार लघुनिबंधाची कुंपणे ओलांडून ललित गद्याच्या व्यापक प्रदेशात येतो. त्यामुळेच तिसऱ्या प्रकरणात ललित गद्याच्या विविध स्वरूपांचा तात्त्विक विचार यादवांनी केलेला दिसतो. विषयाच्या वस्तुनिष्ठ विचारापेक्षा लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचा दृष्टिकोण व वैयक्तिक अनुभूती यांना लघुनिबंधात महत्त्व असते. म्हणजे त्यातून प्रकट होणारा लेखकाचा 'मी' हे लघुनिबंधाचे वैशिष्ट्य वा व्यवच्छेदक लक्षण असते. लेखकाचे व्यक्तिमत्त्व संपन्न असेल तर त्याचे ललितनिबंधही कसदार झालेले दिसतात, ते त्यामुळेच. हे लेखकाचे व्यक्तिमत्त्व कथा, कादंबरी, नाटकापेक्षा ललित गद्यातच मोकळेपणाने कसे व्यक्त होऊ शकते, याचे विवेचन इंग्रजी पार्श्वभूमीचा संदर्भ देऊन तसेच मराठीतील उदाहरणे घेऊन यादवांनी केले आहे. आणि ललित गद्यातही विविध लेखकांच्या निबंधांची तुलना करून लेखकाचे 'मी'त्व आविष्कृत होण्याच्या दृष्टीने ललित गद्यातील विविध प्रकारांचा अनुक्रम ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. यादवांनी लावलेला क्रम असा : १) आठवणी, अनुभव सांगणारे लेख, २) लघुनिबंध, ३) प्रवासलेख, ४) परिचयातील व्यक्तींची व्यक्तिचित्रे, ५) ललितलेख.

ललित गद्यात लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची व्याप्ती आणि विषयवस्तूची व्याप्ती यांचे प्रमाण परस्परविरोधी असते, असा सर्वसामान्य विचार या वर्गीकरणामागे व अनुक्रमे ठरविण्यामागे गृहीत धरलेला आहे. तो मान्य होण्यासारखा आहे. पण यादवांनी निश्चित केलेला अनुक्रम अंतिमत: त्या त्या लेखकाच्या स्वभावधर्मानुसार थोडाफार बदलण्याची शक्यता आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र मराठीत विकसित झालेल्या ललित गद्याच्या विविध प्रकारांची तात्त्विक चिकित्सा

करण्याची जी नवी दिशा या प्रकरणातील चर्चेतून सूचित झाली आहे, ती अभ्यासकांना निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. सोबत जोडलेल्या परिशिष्टात, हा विषय महाविद्यालयांत शिकविणाऱ्या प्राध्यापकांना काही सूचना केलेल्या आहेत. तसेच फडकेपूर्वकाळात लिहिल्या गेलेल्या उत्तम लघुनिबंधांची आणि नंतरच्या काळातील सर्व महत्त्वाच्या ललित गद्यकारांच्या पुस्तकांची अकारविल्हे यादी सोबत जोडली आहे. ती सर्व विद्यमान व भावी अभ्यासकांना संदर्भ शोधण्यास साहाय्यक ठरणार आहे. सर्व प्रकारच्या अभ्यासकांना तसेच जिज्ञासू वाचकांना आवश्यक ती माहिती या छोट्या पुस्तकात उपलब्ध झाली आहे

**—उमाकांत कामत**

**मराठी लघुनिबंधाचा इतिहास, पृष्ठे १०८, सत्तर रुपये**

---

## दगडातले शिल्प जिवंत व्हावे असा कलात्मक अनुभव देणारी कादंबरी

# नटरंग

**डॉ.** आनंद यादव यांच्या 'गोतावळा' कादंबरीने ग्रामीण साहित्यात एक मानदंड स्थापन केला. त्यानंतर 'नटरंग' कादंबरी खूप चर्चिली गेली. मांजरीला आदिम स्त्रीशक्तीचे प्रतीक मानून लिहिलेली 'माऊली' ही कादंबरीसुद्धा डॉ. यादवांची जबरदस्त निरीक्षणशक्ती, जीवनाकडे सर्वांगीणतेने पाहण्याची दृष्टी आणि मानवेतर प्राण्यांविषयी असणारी त्यांची जवळीक यांचा परिचय करून देते.

नंतरच्या काळात डॉ. आनंद यादव यांनी 'झोंबी' मध्ये आत्मकथनात्मक कादंबरीच्या प्रकाराला सखोल दृष्टी देऊन कलात्मकतेच्या शिखरबिंदूपर्यंत पोचविले. या कादंबरीसाठी त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. यादव यांच्या बहुतेक पुस्तकांना राज्यशासनाचे किंवा इतर प्रतिष्ठित पुरस्कार मिळालेले आहेत. 'झोंबी'ची साहित्यिक, समीक्षक आणि जाणकार वाचक यांनी अभूतपूर्व प्रशंसा केली. सामान्य वाचकांनी अक्षरश: शेकडो पत्रे पाठवून यादवांच्या या कादंबरीविषयी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यानंतर 'नांगरणी' आणि 'घरभिंती' व 'काचवेल' हे तीन भाग प्रकाशित झाले. डॉ. यादवांनी कथा, ललितनिबंध आणि कविता



लिहिल्या आहेत. आपली निर्मितिप्रक्रिया व संपूर्ण साहित्याची निर्मिती प्रक्रिया यांच्याविषयी ते सुरुवातीपासूनच सजग राहिले आहेत. मराठी ग्रामीण साहित्याचे केवळ विविध दृष्टीने सखोल चिंतनच केले नाही तर ग्रामीण साहित्य-चळवळीचे नेतृत्वही केले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये ग्रामीण जीवनात सहजपणे प्राप्त झालेल्या समन्वयाचे तत्त्व विशेष पाहायला मिळते. कलात्मक मूल्यांची अवहेलना न करता जीवनाची खरीखुरी वास्तवता त्यांच्या रचनांमध्ये साकारली आहे. त्यांनी गरीबीविषयी घृणा अवश्य आहे परंतु ईर्ष्या आणि द्वेष यांवर त्यांच्या कथावस्तू उभ्या नाहीत. समाजातील अमानवीयतेची जाण करुणेच्या प्रभावामुळे अमानुष होत नाही. जीवनातील घोर संघर्षाने त्यांना जीवन-रसापासून वंचित केले नाही तसेच भोगाच्या अतिरेकी लालसेने त्यांना आत्मकेंद्रित बनवले नाही. त्यांची सामाजिक जाणीव आणि शोषित समाजाविषयीची बांधिलकी एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानाने किंवा विशिष्ट जीवनदृष्टीने मर्यादित झालेली नाही. ती दिखाऊ किंवा नकली नाही. तसेच शब्दबंबाळ नाही. जीवनाविषयीच्या सखोल आस्थेने त्यांनी शोषण, गरीबी आणि विषमता यांचा आत्मविकासाचे साधन म्हणून गंभीरपणे वापर करून घेतला आहे. त्यामुळे त्यांनी कधी तडजोड केली नाही की निराशेमुळे ते हतबलही झाले नाहीत. अतिवृष्टी आणि अवर्षण यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळाशी सामना करणाऱ्या शेतकऱ्याची आकांक्षा त्यांच्यामध्ये आहे. पडीक जमिनीतही हिमतीने बी पेरून नवे पीक घेण्याच्या निर्मितिप्रक्रियेशी संबंधित आहे.

आनंद यादवांच्या लेखकीय व्यक्तिमत्त्वाची बहुतेक सारी वैशिष्ट्ये 'नटरंग'मध्ये प्रभावीपणे व्यक्त झाली आहेत. 'नटरंग' ही एका कलावंताची अनेकांगी शोकांतिका आहे. परंतु या शोकांतिकेमध्ये सुद्धा भारतीय संस्कारानुसार तो कलावंत आपल्या कलानिर्मितीची जिद्द सोडत नाही. या जिद्दीचे मूळ भारतीय दार्शनिक संस्कृतीत समाविष्ट आहे.

'नटरंग' मधील कलावंताचा संघर्ष अनेक स्तरांवरील आहे. तणावांची रूपेही अनेक आहेत.

संघर्षाचे एक रूप जीवनाचे भयानक दारिद्र्य आणि कलात्मक ऊर्जा यामधील तणावपूर्ण संबंधामध्ये दिसते. दुसरे रूप कलावंताचे कुटुंब आणि कलावंताचे व्यक्तित्व यातील संघर्षामध्ये व्यक्त होते. तिसरे रूप मांग समाजाची जीवनविषयक रुढीग्रस्त जाणीव आणि कलाकाराची आत्मप्रेरणा व आकांक्षा यामध्ये प्रकट होते. चौथ्या स्तरावर हा संघर्ष, कलेचा उपयोग पोट भरण्यासाठी करणारे सहकारी आणि कलेच्या विशुद्ध, निरुद्देश रूपाचा ध्यास घेतलेला कलावंत यांच्या संबंधाद्वारे स्पष्ट होतो. संघर्षाचा कलात्मक दृष्टिकोन कलावंताच्या मानसिक अंतर्द्वंद्वामध्ये प्रकट होतो. आपली खोटी प्रतिष्ठा आणि मानापमान या दोनच अपेक्षांच्या बळावरती प्रौढी मिरवणारे, राजकीय क्षेत्रात पैशाच्या बळावर महत्व मिळवणारे, संस्कृतिहीन, क्रूरनवधनाढ्यां बरोबर चाललेल्या संघर्षामुळे कादंबरातील अनुभवांना एक सामाजिक, राजकीय, आर्थिक आशय दिला आहे. या साऱ्या केंद्रांना एकजीव करून भारतीय दृष्टीने या अनुभवाला एक आकार प्राप्त झाला आहे.

संघर्ष, तणाव आणि द्वंद्व यांची अनेक रूपे कादंबरीत दिसतात. लेखकाचे वैशिष्ट्य हे

की, सारे तणाव गणिती पद्धतीने किंवा बौद्धिकतेच्या आधारे व्यक्त होत नाहीत तर कलात्मक अटींचे सहजपणे पालन करत जीवनानुभवांच्या अंगोपांगासह प्रकट होतात.

आनंद यादवांनी मातंगवाडीची परिस्थिती पाहिली आहे आणि कदाचित कोणत्या ना कोणत्या रूपाने अनुभवली देखील आहे. यामुळेच साऱ्या परिस्थितीची वास्तवता परिणामासहित 'नटरंग'मध्ये व्यक्त झाली आहे. प्रसंगांना चित्रवत आकार देण्याची आणि त्यांना रसपूर्ण बनविण्याची या त्यांची क्षमता विलक्षण आहे. करुण प्रसंगांबरोबर विनोदपूर्ण, हास्यपूर्ण प्रसंगांच्या निर्मितीची क्षमता त्यांच्याकडे आहे. हास्यामध्ये अश्लील संकेत आहेत. ते तमाशाजीवनाचे अविभाज्य भाग आहेत. हास्यामध्ये निष्कलंक शुभ्रताही आहे आणि कृष्णरंगाचा विनोदही आहे. अभावयुक्त आयुष्यात हसण्याची कला मातंगवाडीचे तरुण जाणतात. तमाशाच्या रूपावर चांगली पकड आहे. त्यामुळे कादंबरीचे वातावरण जिवंत झाले आहे. मनोवैज्ञानिक स्पर्शाची क्षमताही आहे. गावातील बोलीभाषा, स्वाभाविक चित्रमयता, नादसौंदर्य यांच्यामुळे समग्र वातावरण निर्मिती चैतन्यपूर्ण होते. पार्वती परमेश्वराच्या आदिम, अद्वैत संबंधांना अंतरिक प्रतितीने ओळखण्याची ताकद सुद्धा त्यांच्यात आहे. यामुळे 'नटरंग' ही रचना केवळ तमाशा-जीवनापुरतीच किंवा कलाकाराच्या समस्येपुरतीच मर्यादित राहत नाही तर मनाला खोलवर स्पर्श करून जाते. भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि परंपरा यांची बळकट पार्श्वभूमी आहे. एक मौल्यवान आणि समृद्ध जीवनानुभव वाचकाच्या पदरी पडतो. हा 'नटरंग' अर्धनारीनटेश्वराच्या मनोभूमिकेचे काही अमूल्य अनुभव वाचकाच्या झोळीत टाकतो. भारतात सामान्य शेतकरीही तत्त्वज्ञानाचे बोल उत्स्फूर्तपणे बोलतो. हा संत साहित्याचा समाजमनावरचा खोलवरचा प्रभाव आहे. हा प्रभाव आनंद यादवांच्या शेतकरी मनातून अंत:स्फूर्तीने उमलला तर ते अगदी स्वाभाविक आहे. अस्सल कलाकृतीत भारतीयतेचा प्रत्यय जाणवतो तो या तऱ्हेने.

– *हिंदी लेख* - ***डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर,*** *मराठीत अनुवाद* - ***प्रा. अनिल बोधे***

'नटरंग' वाचली. शेवटचे पान मिटले आणि लगेच पहिल्या पानापासून पुन्हा दुसऱ्यांदा वाचून काढली. 'नटरंग'ने मला झपाटून टाकले. एका कलावंताची शोकान्तिका मनाला पिळून-पिळवटून गेली. आणि म्हणूनही मन 'सुखावून' गेले. हे 'सुखावणे' कलानंदी टाळी लागण्याचे. कादंबरीचा रचनाबंध अतिशय रेखीव आहे... देखणा आहे... एखाद्या शिल्पासारखा! दगडातले शिल्प जिवंत व्हावे आणि बघणारा, अनुभवणारा दगडासारखा निश्चल व्हावा, तसे. ....कलात्मकतेचे हे परिपूर्ण भान भुरळ घालणारे ठरावे. ...मला ही कादंबरी महाकाव्यसदृश वाटली...'

– ***मनोहर तल्हार***

'गेल्या तीन दशकांतील (१९५० ते १९८०) ज्या काही कादंबऱ्यांनी मराठी ललित साहित्याच्या क्षेत्रात ठसे उमटविले त्यांमध्ये आनंद यादव यांच्या 'नटरंग'चे यश उल्लेखनीय ठरले. चाकोरीबाहेर जाऊन निवडलेली कलावस्तू, निवेदनाचे साधेच परंतु आशयानुकूल आणि अर्थगर्भ स्वच्छ रूप, नेमक्या प्रतिमांच्या साह्याने खुलत जाणाऱ्या प्रसंगांची दीप्ती, भोवतालच्या



परिसराचे मूळ कथावस्तूशी निगडीत झालेले नाते आणि संपूर्ण आशयातून व्यक्त होत गेलेली मनाची स्पंदने ही कादंबरी वैशिष्ट्ये आहेत....'

– ***वि. शं. पारगावकर***

**नटरंग, पृष्ठे १८७, एकशेपंचवीस रुपये**

## ग्रामीण भागातील बदलत्या गतिमान सामाजिकतेचा शाश्वत आविष्कार

# उखडलेली झाडे

'प्रतिभावंत लेखक आपल्या मातीशी प्रामाणिक असेल, माणसावर प्रेम करणारा असेल व तरीही तटस्थ कलात्मकतेने लेखन करीत असेल तर शक्तिशाली लेखन जन्माला येते. 'उखडलेली झाडे' मधील कथा या प्रकारात मोडणाऱ्या आहेत. म्हणूनच त्यांचे वर्णन 'सामाजिक निष्ठांचा हृद्य ललितबंध' असे करावेसे वाटते.'

– ***प्रा. विशाखा वडस्कर***

आनंद यादव यांच्या रूपाने ग्रामीण कथाविश्वाला एक 'खळाळता' प्रवाह लाभल्याचे बहुतेक समीक्षकांनी मोकळ्या मनाने स्वीकारले आहे. सातत्याने प्रयोगरत असलेले यादवांचे वाङ्मयीन व्यक्तित्व ग्रामीण जनजीवनातील अनेक अंधाऱ्या कानाकोपऱ्यांना नेहमीच सामोरे गेले आहे. यादवांच्या एकूण पंधरा कथांचा 'उखडलेली झाडे' हा संग्रह ग्रामीण कथासाहित्याला मिळालेले एक समर्थ वेगळे वळण म्हणून उल्लेखनीय आहे.

साहित्य व समाज यांचा अनन्यसाधारण असा संबंध आहे. यादवांनी एक कलावंत या नात्याने ही गोष्ट कधीच दुर्लक्षिली नाही. त्यामुळे बदलत्या गतिस्थितीचे वास्तव कलात्मक दर्शन त्यांच्या कथांचा मूळ गाभा आहे. विविध परिवर्तनाबरोबर नवनवीन शास्त्रीय सुधारणा उद्योग - व्यवसाय, विकास-प्रकल्प शैक्षणिक संधी इ. चा ओघ खेड्यावाड्याकडे वळतो आहे, हे स्वागतार्ह असले तरी कामकरी वर्गाचे दुख:भोग कमी होण्याऐवजी ते वाढले आहेत, ही विदारक, विपरीत परिस्थिती हा 'उखडलेली झाडे' मधील कथांचा केंद्रवर्ती आशय आहे. सत्ता संपत्ती व साधनांचा संचयकर्ता मूठभर स्वार्थी समाज प्रत्यही नाना हिकमती लढवून तळागाळातील कष्टकरी

वर्गाला छळत असतो. श्रमजीवींच्या घामावर, राबणाऱ्यांच्या रक्तावर बांडगुळाप्रमाणे वाढणारा उच्चभ्रू, बुद्धिजीवी वर्ग आपमतलबीपणात मशगूल असे संथ, सुखद लयीतील सोनेरी जीवन जगत असतो. आपल्या जीवनात सुगंधी सुखाचे सूर झंकारणाऱ्या अधस्तरीय समाजाचे, त्याच्या भोगवट्याचे नि होरपळीचे गांजलेपण हा वर्ग सोयिस्करपणे डोळ्यांआड करतो. मातीवर ज्यांचा खरा मूळ अधिकार आहे, अशी मातीतली माणसे मातीमोल झाली तर उच्चभ्रूंना सोयरसुतक नसते. या वस्तुस्थितीचे विचारोत्तेजक व क्रांतदर्शी चित्रण प्रत्ययकारी शैलीत आले आहे.

'उखडलेल्या झाडां'ची ही कथा - घामाची, घामाच्या न्याय्य दामाची आदिम कहाणी आहे. त्यामुळे ग्रामीण कथा म्हटली की ती किस्सेवजा, मनोरंजनात्मक असणार किंवा असली पाहिजे, हा समज दूर होतो. प्रत्येक कथा समस्याप्रधान व प्रबोधनात्मक आहे. तरीही ती कुठेच विचारजड नाही, उलट अतिशय कुशलतेने उमलणारी अशी कलात्मक रचना आहे. एक एक कथा यादवांच्या अस्सल व अभिजात कष्टाळू प्रतिभेचे सर्वांगसुन्दर लेणे आहे. झाडे म्हणजे मातीचे पुत्र. त्यांना समूळ उखडून लावणारी स्वार्थी समाजरचना ही जशी कानामागून येऊन तिखट झालेली व बांडगुळासारखी आहे, तसेच मानवी समाजाच्या बाबतीतही म्हणता येते याचे सूचक व प्रतीकात्मक दर्शन यादवांनी घडविले आहे.

उखडलेल्या झाडांच्या मुक्या वेदनांचे मूक क्रंदन मन हेलावून सोडते. झाडाच्या स्वभावाला साजेशी शीतलता, सोशिकता व आपल्या दुखरेपणाचा मंद घोष करणारी शब्दांची पानगळ समरसून समोर येताना झाडांचे दु:ख अधिकाधिक गहिरे होत जाते.

—***वसंत केशव पाटील***

**उखडलेली झाडे, पृष्ठे १८५, सत्तर रुपये**



## जीवनेच्छेच्या आदिम प्रेरणेचा कलात्मक शोध

# माऊली

**का**दंबरीच्या क्षेत्रात यादवांनी पहिले पाऊल टाकले तेच अतिशय दमदारपणाने. 'गोतावळा' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीने आधुनिक मराठी श्रेष्ठ कादंबऱ्यात स्थान मिळवले. अनागर परंपरांमधून घडलेले मन, त्याच्या परिसरात आधुनिकतेच्या रेट्यामुळे होत असलेले बदल आणि त्यांच्या परस्परांबद्दल होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया यांचे सखोल दर्शन यादवांच्या लेखनातून होते.

१९७९ ते १९८५ च्या दरम्यान यादवांनी 'माऊली'वर पुनर्लेखनाचे संस्कार केले आहेत. यादवांची पुनर्लेखने आणि परिष्करणे हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. महत्त्वाचा मुद्दा असा की, आपल्या उत्स्फूर्त प्रतिभेवर भरंवसा ठेवून आपल्या लेखणीतून उतरलेला प्रत्येक शब्द अ-परिवर्तनीय आहे, वज्रलेप आहे असे यादव मानीत नाहीत. स्वत:चे समाधान होईपर्यंत ते लेखनात पुस्त्यादुरुस्त्या करीत राहातात. त्यामधून त्यांच्यातील जागरुक, जबाबदार आणि नम्र कलावंताचे दर्शन होते. निर्मितिप्रक्रियेबद्दल यादवांना विलक्षण कुतूहल आहे. विशिष्ट कथांबद्दल त्यांच्या लेखकांच्या यादवांनी घेतलेल्या मुलाखती अनेकांनी वाचलेल्या असतील. निर्मिती, अस्तित्व आणि मृत्यू ही जीवनाची अपरिहार्य अंगे आहेत. त्यांच्याबद्दल यादवांचे चिंतन काव्यात्मतेच्या पातळीला भिडल्याचा प्रत्यय 'माऊली'च्या वाचकाला येतो. 'माऊली'ची नायिका आहे एक मांजरी. स्वत:च जन्म दिलेल्या बोक्यांकडून फळलेली, पिलांच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी झगडणारी आणि उत्क्रांतीचा स्पर्श न झालेली ही मांजरी यादवांच्या लेखी आदिमाया ठरते. तिचे फळणे, गर्भारपण, बाळंतपण आणि पिलांवर संरक्षणाची, संवर्धनाची सावली धरणे हा या कादंबरीचा विषय आहे.

सुरुवातीपासूनच स्त्रीत्व आणि मातृत्व यांच्या एकरूपतेने लेखकमन व्यापलेले आहे. मांजरीच्या मातृत्व सोहळ्यात लेखकाला आदिमायेचे, प्रकृतीचे दर्शन होते. ''आदिमायेचं चक्र ती फिरवित आहे. हिला पती नाही, फक्त पुत्र आहेत. हिचे पती पुत्र. हिचे पुत्रच हिचे पती. स्वत:ला मातृत्व देत हिच्यातून हीच जन्माला येते... ओम स्वयंसंमाता आदिप्रकृती माऊली.''

ऋग्वेदातील यमी, लोकमानसातील सटवाई, आधुनिक इतिहासातील हिटलर अशा अनेक संदर्भांनी ही कादंबरी गहिरी व अर्थपूर्ण बनत जाते. यादवांची प्रतिमासृष्टी हाही खास अभ्यास करण्यासारखा विषय आहे. निसर्ग, प्राणीजीवन, जनजीवन, आधुनिक विज्ञान आणि यंत्रसंस्कृती, धर्म, भारतीय साहित्य, लोककथा व संकेत अशा अनेक क्षेत्रातील प्रतिमा यादव वापरतात. मांजरी ज्या खोक्यात व्याली होती ते त्यांना जगदंबेच्या देवळासारखे वाटते. मांजरी 'मोरासारखी करुण' झाल्याचे ते सांगतात. मांजरीच्या पिलाचे कान 'दुमडलेल्या कागदाच्या बारीक कोपऱ्याएवढे' असतात.

यादवांच्या भाषाशैलीमध्ये बोलीभाषेतील शब्द, क्रियापदरूपे, लय यांना महत्त्वाचे स्थान आहे. सहजता, नेमकेपणा, चित्रमयता ही तिची वैशिष्ट्ये. यांमुळे यादवांच्या लेखनाला कोल्हापूर भागातल्या मातीचा वास येतो, आणि त्या भागातल्या जीवनाचे रंग जाणवतात. गद्य पातळीवरील निवेदन, प्रतिमांच्या वापरामुळे काव्याशी जवळीक साधणारी शैली आणि प्रतिमा, लय मांडणी यांमधून कविताच बनलेले लेखन अशा तीन पातळ्यांवरील शैलीच्या धाग्यादोऱ्यांनी यादवांनी ही कादंबरी विणलेली आहे.

या तिन्ही पातळ्या एकमेकींमध्ये मिसळून गेलेल्या असल्यामुळे ही कादंबरी म्हणजे वाचकाला अंतर्मुख करणारी, जीवनाच्या मूलभूत स्वरूपाबद्दल विचार करायला लावणारी एक महत्त्वाची साहित्यकृती झाली आहे.

***—प्र. ना. परांजपे***

**माऊली, पृष्ठे १८३, साठ रुपये**



**स्वातंत्र्योत्तर काळातील बेकारीने गांजलेल्या ग्रामीण युवकाची हृदयस्पर्शी कथा**

# एकलकोंडा

आजच्या मूल्य हरवून बसलेल्या समाजात मनुष्य निराश्रित, पतनोन्मुख झाल्याची जाणीव आपणांस क्षणोक्षणी येते. जीवन उभारण्याची उभारी घेऊन उठलेल्या असहाय्य व्यक्तीस तर या बदलत्या समाजाचे बरेवाईट अनुभव पदोपदी येतात. परिणामी उदासीनता, परकेपणा, एकाकीपणा निर्माण होतो. या यथार्थ अनुभूतीचा प्रत्यय देणारी आनंद यादव यांची 'एकलकोंडा' ही कादंबरी पानागणिक वाचकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य घेऊन येते.

ग्रामीण परिसर, ग्रामीण पात्रे व ग्रामीण भाषा (पण ग्राम्य नव्हे!) या त्रयीतून पुललेली ही कादंबरी मराठी ग्रामीण साहित्याच्या इतिहासात मोलाची भर घालणारी ठरावी. पानकवली गावच्या एका हातावरचं पोट असणाऱ्या कुटुंबातील 'धोंडीराम' या धोंड्याचा राम कसा होतो याची ही कथा. लहानपणीच आई-वडील वारल्यामुळे काकांच्या आश्रयाला आलेला राम स्वत:च्याच घरी परका ठरतो. पुढे एका वकिलांचा घरगडी बनतो. वकील नोकरीसाठी परगावी निघून गेल्यावर नशीब काढायला तो कोल्हापूर, पुणे, मुंबई इ. ठिकाणी जातो. हमाल, किंवा कोळशाच्या वखारीत गडी म्हणून आईच्या शिकवणीनुसार प्रामाणिकपणे काम करतो, शिकत राहतो. साने गुरुजींचे साहित्य वाचून झपाटला जातो. स्वाभिमानाने उभे राहण्याचा अनेक वेळा प्रयत्न करूनही हताश झालेला राम पुनश्च पानकवलीत येऊन सुखावतो.

अशी एक सामान्य कथाबीज घेऊन आकारलेली ही कादंबरी निखळ आत्मकथनाने वाचकांचे हृदय गलबलून टाकते. या कादंबरीचे सारे श्रेष्ठत्व अनुभवांच्या प्रामाणिक अभिव्यक्तीत आहे. कादंबरीत कुठेही उपमा, अनुप्रास सोस नसतांनाही ही कथा केवळ क्रमगत घटनांच्या जोरावर उभी राहते. महाराष्ट्र टाइम्सकारांनी 'यादव पत्रिका' अग्रलेखात ग्रामीण साहित्यातील आनंद यादवांच्या देण्याबद्दल जे मतप्रदर्शन केले होते, त्याचे उत्तर म्हणूनही या कादंबरीकडे पाहायला हरकत नाही. अण्णाभाऊ साठ्यांनी मराठी साहित्यात ग्रामीण

कथानकांची परंपरा निर्माण केली. या परंपरेचा वारसा घेऊन पुढे येणाऱ्या या कादंबरीत कथानकाचा घाट पारंपरिक असला तरी चिंतन मात्र खचितच यंत्रयुगोत्तर आहे.

—*डॉ. सुनिलकुमार लवटे*

**एकलकोंडा, पृष्ठे १०३, पस्तीस रुपये**

## व्यक्तिमत्त्वाच्या द्वंद्वात्मक ताणांतून आकारलेले ‘पाणभवरे’

# पाणभवरे

‘पाणभवरे’ मधील लेखन हे अनुभवकथन या उपप्रकारांत मोडणारे आहे. स्वत:ला येणाऱ्या अनेक अनुभवांच्या द्वारा आत्मस्वरूप शोधण्याचा, न्याहाळण्याचा प्रयत्न या लेखांमधून आढळतो. अनेक समाजवास्तवाचे संदर्भही त्यांनी व्यक्त केले आहेत. संग्रहातील लेखांचा घाट हा प्रामुख्याने एक अनुभव व त्यातून - अनुभवाच्या पोटातूनच उमलणारे चिंतन, असा आहे. तीव्र भावावस्था, घनिष्ट निसर्ग, तसेच समाजसंबध व तीव्र संवेदनशीलता, ही या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

‘पाणभवरे’ मधील सगळे लेख लेखकाच्या संवेदनाविश्वाशी निगडित आहेत आणि त्यांचा मध्यबिंदू हा ग्रामीण भागातून शहरांत आलेल्या, परंतु शहरी जीवनाशी नाते न जुळलेल्या मनाशी आहे. त्यामुळेच ग्रामीण आणि शहरी अशा मिश्र अनुभवांचे दर्शन या लेखनातून घडते. त्यांचा बालपणाचा काळ खेड्यांत व नंतर शिक्षण व नोकरी या निमित्तांनी ते शहरात आले, त्यामुळे मनाचे दुभंगलेपण या अनुभवांत गेला आहे.

या लेखांमधून यादवांनी गावाकडचा परिसर, तिथल्या व्यक्ती, सगेसोयरे, तसेच बदललेली सामाजिक-आर्थिक परिस्थिती, इत्यादींचे दर्शन घडविले आहे. अनेक लेख शहरी संस्कृतीशी निगडित असले, तरी या लेखांमधूनही गांवाकडच्या आठवणी मधूनमधून येतातच. या लेखांमधून दिसते ती शहरी संस्कृतीच्या वातावरणाशी जुळवून घेताना, तिच्यात रुजताना यादवांच्या मनाची झालेली तडफड, त्यांना आपल्या स्वत:च्या मनाशीच करावा लागलेला संघर्ष. गांवाकडील परिसराचे, निसर्गाचे चित्रण करतांना यादवांची भाषा अतिशय संवेदनशील, काव्यात्म होते. हा त्यांच्या एकूण लेखनाचा विशेषच येथे दिसतो.

सहजपणे त्यांच्या गद्यालाच काव्याची कळा कशी लाभते, हे ‘भाकरीचे झाड’ लेखातील ओळीओळींतून कळते. निसर्ग व माणसे यांच्यातील अभिन्न नाते इथे पाहता येते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांतील मिस्किल स्वभावाचा, विनोदगुणाचा प्रत्यय ‘पैलावनकी’ या लेखांतून येतो. लेखकाच्या आयुष्यात घडून गेलेल्या पैलवानकीचे, गंमती-जमतीचे मिस्किल दर्शन घडविणारा हा लेख आहे. ‘दादांची भाकरी’ या लेखात यादव आपल्या वडिलांच्या भावविश्वात शिरून त्या भावविश्वाचा जो वेध घेतात, तो मूळातूनच वाचण्यासारखा आहे.

गावाकडील लेखांमधून दिसणारे लेखकाचे बालपण, जुने जग आता दूर गेले आहे, काहीशा आभासाच्या पातळीवर उभे आहे. या जगाकडे जाणारी वाट आता हरवलेली आहे. गावात तो आता ‘परका’ ठरत आहे. या साऱ्याची जाणीव त्याला खिन्न करते आणि म्हणूनच की काय, मागे पडलेले ते जुने जग आपल्या स्मृतिकोषात घट्ट पकडून ठेवण्याचा, उत्कटपणे साठविण्याचा प्रयत्न करताना यादव दिसतात. ते जग आपणापासून दूर गेलेले आहे म्हणून वाटणारी हळवी भावविवशता मात्र येथे नाही. तशी ती असती, तर हे सर्वच लेखन भावुक, शब्दबंबाळ व बटबटीत झाले असते.

संग्रहातील काही लेख शहरी संस्कृतीचे, वातावरणाचे दर्शन घडविणारे आहेत. या लेखांमधून दिसते ते व्यक्तिगत तसेच भोवतालच्या समाजवास्तवाने दिवसेंदिवस धारण केलेले उग्र रूप व त्यातून समाजमनाला हळूहळू, तर कधी वेगाने व आवेगाने व्यापून टाकणारी संवेदनशीलता. खोट्या संस्कृतीच्या नि सुखाच्या विटा निर्माण करता करता स्थायी भाव-स्वभाव हरवून बसलेले हे वास्तव आहे.

या सर्व लेखनात बदलत्या वास्तवाचे भान आहे. आजच्या आधुनिक जीवनातील मानसिक गुंतागुंत आहे. सुरक्षिततेची सर्व खबरदारी घेतल्यावरही क्षणोक्षणी जाणवणारी असुरक्षितता आहे, धपापलेपण आहे. सामान्य माणसाची दैनंदिन जीवनातली साशंक भीती आहे. यांत्रिक जीवनातली कृत्रिमता आहे. पांढरपेशी प्रतिष्ठा जपताना होणारी मनाची तगमग आहे. संस्काराची गिरवलेली, न पुसली जाणारी वलये आहेत. वास्तवाचे निदान करणारी शोधदृष्टी आहे. तरल, भावस्पर्शी संवेदनेची वीण आहे. यांत्रिकतेने जखडलेल्या शहरातील हे विविध अनुभव, आज माणसाला प्राप्त झालेल्या ‘प्रलयपुरातील बाहुली’च्या स्वरूपाची जाणीव करून देतात.... माणसाचे निसर्गाशी असलेले आंतरिक नाते, या निसर्गाचे मानवी जीवनातील स्थान, यांचा विचारही या लेखांमधून केला आहे.

या लेखांमध्ये ‘मी’ हा केन्द्रबिंदू असून त्याच्या भावना, जाणिवा, सुखदु:ख, त्याच्या मनातील विविध संघर्ष, त्याचे दुसऱ्या माणसांशी नाते, त्याचे समाजातील आणि कुटुंबातील स्थान, इत्यादींचे चित्रण झाले आहे. ‘पाणभवरे’ मधील ‘मी’चें लक्षात घेण्याजोगे वैशिष्ट्य हे की, हा ‘मी’ आत्मचरित्रात्मक असूनही तो आपल्या नजरेत कधीच खुपत नाही. जे उघडउघड आत्मचरित्रात्मक, ते आत्मप्रदर्शनात्मक होण्याची भीती असते. अलिकडच्या आत्मचरित्रात्मक

लेखनातून अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. यादवांच्या लेखनात आत्मप्रदर्शनाचा हा भाव किंचितही आढळत नाही. या 'मी'चे व्यक्तित्व भडक नाही. ते लाजरे, बुजरे, पापभीरू, माणसांवर नितांत प्रेम करणारे, निसर्गाचे विलक्षण ओढ असणारे आहे. यादव जीवनानुभवांचे दर्शन घडवीत असताना कलार्थाने 'मी'ला विसरतात. म्हणूनच ते त्या जीवनानुभवाबरोबरच ह्या 'मी'चेही यथार्थ दर्शन घडवू शकतात.

यादवांची भाषा संवेदना, काव्यात्मता, तरलता, अनुभवातील चैतन्य उत्तमपणे पेलू शकते, असा अनुभव या लेखनामधून येतो.

***—आलोचना, जून १९८४***

---

## निकोप शृंगाराने फुललेली मोहक स्त्रीरूपे

# स्पर्शकमळे

'स्पर्शकमळे' हा आनंद यादव यांचा शृंगारिक ललितलेखसंग्रह. शृंगारिक या शब्दातून स्पर्शकमळांची वैशिष्ट्ये प्रकट होत असली तरी हा शृंगार नेहमीच्या कथा-कांदबऱ्यांतील शृंगार नाही. स्पर्शातूनच रोमांचित करणारी वर्णने जरूर आहेत, पण ह्या स्पर्शातूनच फुलणारी कमळेही आहेत आणि कुठेतरी उदात्ततेचा स्पर्शही आहे. शृंगारिक मराठी वाङ्‌मयात स्त्रीरूप हे तिच्या शरीरवर्णनातून चित्रित केलेले आजवर तरी जाणवते. हे शरीरवर्णन इतके पराकोटीला जाऊन पोचते की या वर्णनात अश्लीलता लगेच जाणवते. स्त्रीच्या शरीराचे वर्णन करताना लेखण्यांना इतकी गोलाई येते की ही वर्णने वाचू नयेशी वाटतात, अभिरुचीला ती दूषित करतात. 'स्पर्शकमळे'मधील लेखन मात्र तसे नाही.

'स्पर्शकमळां'तील ललितलेखांमागे लेखकाची एक निश्चित भूमिका आहे. शरीरधनामुळेच स्त्रीचे स्त्रीपण सिद्ध होते, पण याशिवाय तिच्यात एक आदिम तत्त्व लपलेले आहे, ती निसर्गरूपधारिणी आहे, ती मनामनातून आकारणारी आहे, ती शब्दांतून आपले मन साकार करणारी आहे, शेवटी ती एक शक्ती आहे. भोगलालसेच्या विकारी अस्तित्वापलीकडे शृंगारिक वाङ्‌मयात स्त्रीला आणखी एक नितान्त सुंदर अस्तित्व आहे आणि आस्वाद-पातळीवरच तिच्या या अस्तित्वाचे रूपसौंदर्य अनुभवता येते. भोग आणि आस्वाद यात निश्चितच अंतर आहे. एकात सौंदर्याचा नाश करण्याची प्रवृत्ती आहे, सौंदर्याला दुखावून त्याला हळूहळू तेजोहीन करण्याची प्रवृत्ती आहे तर दुसऱ्यात त्या सौंदर्याचे सुंदरपण जपणे आहे, त्या जपण्यात हळुवारपणा आहे. घेतलेला सौंदर्यानुभव हा उध्वस्त करणारा नाही तर जगायला शिकवणारा आहे. 'स्पर्शकमळां'तील फुललेली सृष्टी ही आस्वाद पातळीवरील आहे. त्यामुळे शृंगाराची अशी एक निकोप सृष्टी उमलते की ज्या उमलण्यात सहजता व स्वाभाविकता जाणवते. त्यात सक्तीने पाकळ्या फुंकून दूर करणे नाही. शरीर हीच शृंगारिक वाङ्मयतील वर्णनांना मर्यादा असते पण 'स्पर्शकमळां'तून उमलेली स्त्री ही अंतर्मुख करते. तिच्या स्पर्शात उद्दामपणा नाही, मर्यादेचे उल्लंघन नाही. सूचकतेची एक सीमारेषा तिने आखून घेतली आहे. ह्या रेषेवरूनच ती वाचकांना बोलावते. आपल्या शय्यागृहात ती वाचकांना कधीच नेत नाही.

'स्पर्शकमळां'चे प्रमुख वैशिष्ट्य हेच की उपरेपणाची जाणीव आणि वास्तवाची उणीव यादवांनी भरून काढली आहे. ह्या सर्व लेखांतून वावरणारा जो 'मी' आहे त्या 'मी'चे नाते आत्मचरित्रातील 'मी'शी घनिष्ट संवादी आहे. त्यामुळे या सर्वच लेखांना आत्मानुभवात्मक वास्तवाचे वेगळे अधिष्ठान लाभले आहे. खऱ्याच अर्थाने पहावयाचे झाले तर कमळाची कळी आणि तिचे कमळात रूपांतर होणे हे कळीच्या नैसर्गिक विकासाचेच दर्शक आहे. त्यामध्ये असलेल्या घटनेच्या विकासाला दिशा आहे, तसे ह्या लेखांतून वावरणाऱ्या 'मी'चे रूप हे वास्तवातील 'मी'च्या कळीचेच विकसित रूप आहे.

प्रारंभापासून मनात स्त्रीबद्दल असणारी भावना मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विकास पावते, फुलते. स्पर्शाचा स्पर्शपणा टिपून हे शरीर त्यापलीकडे जाते. जाताना स्पर्शाचे संदर्भ लावते. केवळ फुलाच्या पाकळ्यांवर हे मन न थांबता परागकोशापर्यंत जाते. शेवटी एक सत्य उमलते. 'सखी ही आत्म्यानं बांधलेली प्रकृतीची पूजा आहे.'

आणखी एक गोष्ट लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे आस्वाद घेणारे मन पुरुषमन आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अनुभव घेणारा 'मी' आणि सर्व लेखात वावरणारा 'मी' यांच्या निकट संबंधामुळे हे लेखन ललितलेख या स्वरूपाचे वाटते.

शेवटी एक गोष्ट व्यक्त करावीशी वाटते ती अशी की लेखक असभ्यता, अश्लीलता यांचा स्पर्श होऊ न देता मनातील स्त्रीरूप शब्दांतून साकार करतो. तेव्हा शब्द स्वत:चे शब्दत्व कायम ठेवूनही स्पर्श बनून जातात.

***—प्रतिमा केसकर***

**स्पर्शकमळे, पृष्ठे : १३८ पंचेचाळीस रुपये**

*विविध विषयावरील उत्तम मराठी पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या.*

**आयडियल पुस्तक त्रिवेणी**

छबिलदास रोड, दादर (पश्चिम), मुंबई - २८. फोन - ४३०२१२६

## मातीखालच्या मातीत आपल्या जीवनाचे सोने शोधणारी माणसें

# मातीखालची माती

'मातीखालची माती ओली आणि उबदार असते, तिच्या उबीतच पिकं जीव धरतात...' आनंद यादवांच्या या पुस्तकाच्या पहिल्याच पानावर पुस्तकाचे हृद्गत प्रकट झाले आहे. (त्या आधीही मुखपृष्ठावरील चित्र मातीचा स्पर्श मनाला पोचवतेच!) आपल्या आईच्या तोंडून सहज निघालेला उद्‌गार आनंद यादव देऊन जातात, आणि आपले मनोगतही व्यक्त करून जातात.

आपल्या जीवनातील सोने जीवनाच्या मातीत हुडकणारी व्यक्तिचित्रे यादवांनी रंगविली आहेत. मातीशी त्या माणसांचा अगदी जिव्हाळ्याचा संबंध आहे. त्यामुळेही ग्रामीण जीवनाचे विविध दर्शन घडते.

ग्रामीण जीवनातील ही माणसे वेगवेगळ्या थरांतील आहेत. त्या वर्णनात केवळ माणसेच नाहीत तर जीवनाचे खरेखुरे वातावरण रंगवले आहे. प्रत्येक माणूस वाचकाच्या मनात एक अविस्मरणीय स्थान निर्माण करून जातो. ही माणसे केवळ पुस्तकीच नाहीत, तर आपल्या सभोवताली आहेत, जितीजागती, आपल्याचसारखी. आणि काही वेळा तर त्या त्या माणसांच्या भावभावनांशी, सुखदु:खांशी आपण इतके समरस होतो की, एखाद्याला वाटावे आपलेही 'माणूसपण' लेखकाने हुबेहूब चितारले आहे. मनातल्या मातीत उगवणारे भावनाचे अंकुर लेखकाने अस्सल शैलीत टिपले आहेत. आणि या साऱ्या माणसांचे 'माणूसपण' लेखक स्वत: जगला आहे. त्या वातावरणात त्याचे प्रत्यक्ष जीवन गेले आहे. तोही एक मातीवर विलक्षण प्रेम करणारा जीव आहे. म्हणूनच ही व्यक्तिचित्रे इतकी सरस उमटलेली आहेत.

*—नरेंद्र तुळपुळे*

प्रा. आनंद यादव हे 'हौस' किंवा 'मागणी' म्हणून ग्रामीण लेखनाकडे वळले नाहीत. त्यांचे लहानपण खेड्यातच गेले. त्या जीवनातील सुखदु:खे, सावल्या आणि चटके त्यांनी प्रत्यक्षच अनुभवले आहेत. वाचकांना त्यांची ओळख पानापानावरून पटते.



ह्या एकूण चौदा व्यक्तिकथा आहेत. त्या लिहिताना त्यातील त्या त्या व्यक्ती अधिक ठसठशीतपणे स्पष्ट दिसाव्यात असा लेखकाचा अर्थातच प्रयत्न आहे. त्यामुळे प्रत्येक चित्रणात 'कथातत्त्वा'ला इथे दुय्यम स्थान आहे. व्यक्तींची स्वभाववैशिष्ट्ये दाखविण्यासाठी म्हणून घटना आल्या आहेत. घटनांच्या चित्रणासाठी शब्दचित्रांची उभारणी केलेली नाही.

ह्या व्यक्तिकथा लिहिताना लेखक कुठेही विवश अगर अनावर झाल्याचे दिसत नाही. हा संयमच त्यांनी निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांबद्दल वाचकांच्या मनात अधिक ममत्व निर्माण करतो. किंवा असेही म्हणता येईल की, त्यांनी निवडलेल्या व्यक्तींच्या जीवनातील प्रसंगच इतके प्रभावी आहेत की त्यांचे सहानुभूतीने आणि प्रामाणिकपणे केलेले चित्रणच सहजगत्या प्रभावी होत जाते. त्यामुळे वाचक त्या व्यक्तींच्या सुखदु:खाशी नकळत समरस होत जातो. आपण रेखाटलेल्या व्यक्तीबद्दल वाचकांना सहानुभूती वाटावी, त्यांना भरते यावे, दाटून यावे यासाठी त्यांनी कुठेही कारुण्याची उतरंड रचलेली नाही.

ह्या व्यक्तिकथांतून लेखकाने ग्रामीण वातावरण मोठ्या सामर्थ्याने उभे केले आहे. नुसत्या निरनिराळ्या उपमांकडे जरी या दृष्टीने पाहिले तरी त्यांचे कसब ध्यानांत येईल. अनुभवातील जिवंतपणा, निवेदनातील अकृत्रिम उत्कटता आणि लेखकाचा कलात्मक संयम या त्रिवेणी संगमामुळे पुस्तक वाचून झाल्यावर 'वाचक' हा 'लेखक' होतो! आनंद यादव यांच्याप्रमाणे तो वाचकही त्या व्यक्तिरेखेशी 'चिरपरिचित' होतो. लेखकाच्या सामर्थ्यामुळे वाङ्मयाच्या विश्वात अशा किमया नेहमीच घडत असतात.

*—प्रा. सुधाकर भोसले*

**मातीखालची माती, पृष्ठे १९०, चाळीस रुपये**

### ढंगदार ग्रामीण व्यक्तींच्या खुमासदार कथा

# माळावरची मैना

'गोतावळा' आणि 'खळाळ' यासारख्या गंभीर, आशयघन साहित्याचे लेखक म्हणून वाचकांना परिचित असणाऱ्या श्री. आनंद यादव यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या एका वेगळ्याच पण आल्हाददायक पैलूचे दर्शन 'माळावरची मैना' या कथासंग्रहात घडते. ग्रामीण जीवनातील दु:ख आणि दैन्य यांचा वेध घेऊ पाहाणाऱ्या या लेखकाजवळ आणखी एक मन आहे. हे मन मोठे मिस्किल आणि वात्रट आहे. ग्रामीण जीवनात करुण रस आहे तसाच हास्यरसही भरपूर आहे. याची या मनाला चांगली जाण आहे.

आनंद यादवांनी अनेक व्यक्ती आणि वल्ली मोठ्या मिस्किल नजरेने टिपलेल्या आहेत आणि त्यांच्या साऱ्या व्यक्तिवैशिष्ट्यासह वाचकांच्या पुढे पेश केल्या आहेत. ग्रामीण परिसरातील अशा व्यक्ती आणि वल्लीचे किस्से यादव यांनी सांगितले आहेत तेही मोठ्या ढंगदारपणे. किस्सा हा प्रकारच मुळात चित्तवेधक. किश्श्यामध्ये असते रसरशीत शंभर नंबरी गोष्ट. एकामागून एक येणाऱ्या निखळ घटनांची साखळी.

किस्सा ही प्राधान्याने चुरचुरीतपणे सांगितलेली घटनाप्रधान हकीकत होय. त्यामुळे निवेदनाच्या धाटणीला या ठिकाणी फारच महत्त्व आहे. हकीकत कुठे सुरू करायची, संदेह (सस्पेन्स) कसा निर्माण करायचा आणि अचूक क्षणाला हकीकत संपवून अपेक्षित परिणाम कसा साधायचा याचे कसब ज्याच्याजवळ आहे तोच उत्तम किस्सा सांगू शकतो. 'माळावरची मैना' या संग्रहातील बऱ्याच कथा ह्या कसोटीला उतरतील. 'गुलशनका कुव्वा', 'उखाणा', 'सूरपाट', 'दत्ताचा प्रसाद', 'वरात', 'गुणकारी औषध', 'माळावरची मैना', 'चोर आणि चोरी', 'सोनाची हौस' या कथा निवेदनशैलीमुळे रंगतदार उतरल्या आहेत.

ग्रामीण कथेची लोकप्रियता आणि यश जसं तिच्या 'गोष्टी'पणात आहे तसेच ते तिच्या बोलीभाषेतही आहे. भाषेपेक्षा बोलीभाषा ही नेहमीच अधिक जिवंत आणि रसरशीत असते. प्रौढ आणि प्रगल्भ शहरी भाषेच्या तुलनेने बोलीभाषेचा झणझणीतपणा वाचकाच्या मनाची चटदिशी



पकड घेतो. या बोलीभाषेचा लेखकाने संयमाने पण कौशल्याने वापर केला आहे. खमंग आणि चटपटीत संवाद आणि मोजक्याच शब्दात चित्र उभे करण्याचे लेखकाचे सामर्थ्य यामुळे लेखक सांगत असलेला किस्सा शेवटपर्यंत खुमासदार राहतो.

***—प्रा. वसंत मिरासदार***

आनंद यादवांनी प्रामुख्याने गंभीर प्रकृतीच्या कथा लिहिल्या असल्या तरी त्यांच्या विनोदी कथांचे 'घरजावई' (१९७४) आणि 'माळावरची मैना' (१९७६) हे दोन संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. या दोन्ही संग्रहातील कथा प्रामुख्याने खमंग आणि खुसखुशीत, चटपटीत आणि चुरचुरीत, रंजक आणि रोचक आहेत. आकर्षक निवेदनपद्धती, समर्पक भाषाशैली, उत्कंठावर्धक रचनतंत्र यामुळे ही कथा चटकदार आणि खुमासदार झाली आहे. स्वभावातील विसंगती बारकाईने हेरून त्यांची तपशिलांनिशी मांडणी करणारे हे कथालेखन म्हणजे स्वभावनिष्ठ विनोदाची उत्कृष्ट उदाहरणे होत. आनंद यादवांच्या बहुसंख्य कथांना विनोदी लेखांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्यांची बांधणी बंदिस्त नसून सैल नि ऐसपैस आहे. एखाद्या चांगल्या संभाषणचतुराने मैफल रंगवावी तशी या कथांची रचना आहे. वास्तवाचे अचूक भान राखणारी अन सकस व्यक्तिचित्रणातून साकार होणारी ही कथा वाचकाच्या पदरात मनोरंजनाचे माप भरभरून टाकते.

आनंद यादवांची विनोददृष्टी वास्तवाच्या तळाशी असलेली विसंगती शोधते, तशीच ती चमत्कृतिपूर्ण घटनांचाही आधार घेते. या कथांतील विनोद चमत्कृतिजन्य घटनाप्रसंगांतून निर्माण झालेला असल्यामुळे तो काहीसा अवास्तव आणि अतिरंजित असला तरीही चटकदार आहे. शिक्षण, व्यसन, राजकारण, चोरी, शिरजोरी, चमत्कृतिपूर्ण घटना यातून जसा यादवांच्या कथातील विनोद फुलत जातो, तसाच तो स्त्रीपुरुषसंबंधावर आधारित कथातून प्रकट होतो.

आनंद यादवांनी ग्रामीण परिसरातील ह्या वल्ली मिस्किल नजरेने न्याहाळल्या आणि त्यांचे किस्से ढंगदारपणे सादर केले. किश्श्यात प्रामुख्याने घटनाप्रधान हकीकत असते आणि ती रंजकतेने कथन केलेली असते. त्यामुळे त्यात निवेदनाची धाटणी आणि भाषाशैली फार महत्त्वाची असते. सर्वसाधारणपणे ग्रामीण जीवनातून विनोद फुलवायचे असे म्हटले की, ग्रामीण माणूस हा नागर समाजाच्या दृष्टीने हास्यास्पद कसा आहे, हेच प्रकट करण्याची रीत प्रचलित आहे. पण आनंद यादवांची लेखणी ग्रामीण जीवनचित्रणातून विनोदनिर्मिती करताना ग्रामीण माणसाला हास्यास्पद करीत नाही. वास्तविक पाहता ग्रामीण समाजातील सामान्य माणूस जगण्यासाठी धडपडत असतो. कधीकधी त्याची ही केविलवाणी धडपड त्याला हास्यास्पद करते आणि त्याच्याही नकळतपणे भोवतालच्या परिस्थितीत जगण्याच्या हेतूने सुसंगती निर्माण करण्याच्या प्रयत्नात तो अयशस्वी ठरतो. अशाप्रकारे विनोदाच्या आवरणाखाली झुळझुळणारा कारुण्याच्या झरा अंत:करणाला पाझर फोडतो.

*(आनंद यादव : साहित्य आणि जीवन या ग्रंथातून)*

***—डॉ. एस. एम. कानडजे***

**माळावरची मैना, पृष्ठे १६४, पंचावन्न रुपये**

स्व-रूप
शोधणारी
ग्रामीण कविता

# मळ्याची माती / मायलेकरं

## मळ्याची माती

१९२० ते १९७०मध्ये लिहिल्या गेलेल्या कोणत्याही ग्रामीण कवितेला न लाभलेले आत्मानुभवाचे आणि आत्मप्रत्ययाचे अंगभूत बळ या ग्रामीण कवितेला सहजगत्याच लाभले आहे.

ही कविता कुणाच्याही परिणामाच्या छायेत प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे वावरत नाही. कोणताही अट्टाहास व उसना आविर्भाव न आणता आणि व्याजकाव्यात्मतेच्या भरीला न पडता अनुभवाच्या गाभ्याला नेमका स्पर्श करते.'

**—*डॉ. अनुराधा पोतदार***

**मायलेकरं : एक मुक्त संवाद**

आनंद यादवांची कविता त्यांच्या जीवनाबरोबर वाढत, विकास पावत गेली. १९५४ ते ५९ या काळात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना ग्रामीण जीवनाची उत्कट ओढ होती. त्या ग्रामीण जीवनाचे आणि तेथील निसर्गाच्या सान्निध्यात जगणाऱ्या माणसांच्या भावभावनांचे, त्यांच्या सुखदु:खांचे चित्रण 'हिरवे जग' मध्ये आढळून येते. १९६२ ते ७० या काळात ते पांढरपेशे होऊन मध्यमवर्गीय जीवनाच्या चाकोरीत अडकून पडतात. 'आता आपण आपल्या शेतीमातीला कायमचे पारखे होणार, घरादारापासून शरीरानेच नव्हे तर मनानेही दुरावणार' ही जाणीव त्यांना सलू लागते. या जाणिवेचे प्रतिबिंब 'मळ्याची माती'तील काही कवितांतून स्पष्टपणे उमटले आहे. त्यानंतर त्यांनी ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप, त्याची सुखदु:खे मोठ्या आपुलकीने समजून घेतली. ह्या श्रमिक-शोषित समाजाच्या व्यथावेदनांची अभिव्यक्ती त्यांनी 'मायलेकरं' मध्ये केली आहे.

'मायलेकरं' हा खेड्यातील आई आणि शिकून 'द्विपदवीधर' होऊन परत आलेला मुलगा यांच्यातील एक दीर्घ संवाद आहे. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे या संवादाचे दोन भाग



आहेत. पूर्वार्धात 'माय'चे मनोगत आहे, तर उत्तरार्धात 'लेकरा'ची कैफियत आहे.

'मायलेकरं' या दीर्घकाव्यातील आई ही एक अंतर्बाह्य ग्रामीण माय आहे. तिचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन साधा, एकपदरी आहे. म्हणूनच तिच्या आशाआकांक्षा पारंपरिक आणि प्राकृतिक स्वरूपाच्या आहेत. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांनाच ती महत्त्व देते आणि प्राप्त परिस्थिती निमूटपणे स्वीकारते.

ग्रामीण समाजातून जो एक नवा तरुण शिक्षितवर्ग उदयास येत आहे, त्याचे प्रतिबिंब 'लेकरा'च्या व्यक्तिमत्त्वात उमटलेले दिसून येते. ज्या ग्रामीण वातावरणात आईचा पिंड घडला, त्याच वातावरणात तोही वाढला असल्यामुळे सुरुवातीला त्याची स्वप्रेही आईसारखाची मर्यादित स्वरूपाची असणे स्वाभाविक आहे. पण महानगरातील समाजजीवन पाहून त्याचे मन तळमळते. तेथील राबणारी माणसं, त्यांच्या हालअपेष्टा, त्यांची जीवघेणी भूक, त्यांचे होणारे शोषण पाहून तो चिंधडून जातो. आधुनिक उद्योगांनी ग्रामीण भागातील पेशा-धंदे उखडल्यामुळे तेथून शहराकडे येणारे माणसांचे लोंढे पाहून तो फुटून निघतो. त्याची 'शोषणप्रधान अर्थकारणा'ची जाणीव अधिक तीव्र होते. तेव्हा त्याच्या मनातील 'माय' व्यापक होत होत जनातल्या 'महामाऊली'चे रूप धारण करते.

समर्पक शब्दयोजना, अन्वर्थक प्रतिमा, काव्यात्म चिंतनशीलता, आशयानुकूल रचनाबंध, ग्रामीण माणसाच्या वाट्याला आलेल्या सनातन दु:खाची प्रभावी अभिव्यक्ती, शोषणप्रधान अर्थकारणाची प्रगल्भ जाण इत्यादी वैशिष्ट्यांमुळे 'मायलेकरं' च्या आविष्काराला कलात्मक उंची आणि आशयाला जीवनदर्शनाची खोली प्राप्त झाली आहे.

'हिरवे जग', 'मळ्याची माती', आणि 'मायलेकरं' ह्या तीन काव्यकृती म्हणजे आनंद यादवांच्या काव्यलेखनातील तीन टप्पेच आहेत. खेड्यातील जीवन अकृत्रिमपणे ग्रामीण बोलीत साकार करणे हे 'हिरवे जग'चे उद्दिष्ट आहे, त्या जीवनापासून दुरावल्यामुळे दुभंगलेल्या मनाची तगमग अभिव्यक्त करणे हे 'मळ्याची माती'चे इच्छित आहे आणि मुळात ग्रामीण असलेल्या, पण वाचनचिंतनादी नागरी संस्कारांनी विदग्ध बनलेल्या, ग्रामीण समाजातून पूढे येणाऱ्या नव्या तरुण सुशिक्षित वर्गाची विचारमनस्कता अधोरेखित करणे हे 'मायलेकरं'चे ईप्सित आहे. 'मायलेकरं'तील हे लेकरू म्हणजे जणू ग्रामीण समाजाकडे माऊलीच्या मायेने त्याच्या वेदनेशी नाते जोडणाऱ्या सर्जनशील कलावंताचे, त्याच्या तत्त्वचिंतक मनाचे लघुरूप आहे.

*(आनंद यादव : साहित्य आणि जीवन या ग्रंथातून)*

**—*डॉ. एस.एम. कानडजे***

**मळ्याची माती, पृष्ठे १२६, पस्तीस रुपये**
**मायलेकरं, पृष्ठे ८४, तीस रुपये**

# यादवांच्या आत्मकथनांबद्दल

**एक बाल्य**
**हरवलेलं**
**बालकांड**

## झोंबी

**आ**जच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत अस्वस्थ होऊन धुमसणे हाच ग्रामीण जीवनाचा स्थायी भाव आहे. त्या अस्वस्थपणाचा स्फोट मराठी साहित्यात सुरू झालाच आहे. हे व्हायला हवेच होते. शिवाय, साऱ्या जगातलं साहित्य समृद्ध केलं आहे. ते या 'झोंबी'सारख्या वाचकाला अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथांनीच!

***–पु. ल. देशपांडे***

**झोंबी, पृष्ठे ३७३, एकशे पंचवीस रुपये**

**अनोख्या विश्वाकडे**
**झेपावणाऱ्या तरुणाचे**
**आत्मकथन**

## नांगरणी

**क**णखर सकसता आणण्यासाठी भूमीनं स्वत:वर धारदार अवजारांनी आडवे उभे घाव घालून घेणे आणि सूर्यभट्टीत अंतर्बाह्य होरपळणे म्हणजे नांगरणी. उत्तम पिकांच्या



समृद्धीसाठी शेतमळ्यांवर हिरवीगार साय साकळावी; अंगाखांद्यावरच्या गाईगुरांना, माणसाकाणसांना, किड्यामुंग्यांना, चिमण्या-पाखरांच्या इवल्या चोचींना मूठमूठ-चिमूटचिमूट चाराचणा मिळावा; म्हणून भूमीनं स्वत:ची सोशिकपणे केलेली उरस्फोड म्हणजे नांगरणी.

*(मलपृष्ठावरील मजकूर)*

**नांगरणी, पृष्ठे ३४५, शंभर रुपये**

**ग्रामीण जीवनातील**
**भीषण जीवनसंघर्ष**
**चितारणारी आत्मचरित्रकथा**

## घरभिंती

**म**राठी साहित्याचा मोलाचा ठेवा ठरावा, अशी ही साहित्यकृती. आजच्या जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनातही महाभारतसदृश संघर्षपूर्ण घटना केवळ अस्तित्वासाठी घडत असतात, याचे वास्तवपूर्ण, भेदक दर्शन म्हणजे घरभिंती.

ग्रामीण समाजाच्या सर्वसाधारण स्तरातील कुटुंबाची ही प्रातिनिधिक तरीही वैशिष्ट्यपूर्ण कहाणी. जन्मप्राप्त, अटळ, जीवघेण्या आर्थिक हलाखीचा चक्रव्यूह भेदून बाहेर पडण्यासाठी केवळ काही शैक्षणिक सुविधांच्या तुटपुंज्या आधारावर एका तरुण, संवेदनशील मनाने दिलेला निकराचा पण यशस्वी लढा, हा घरभिंतीचा गाभा.

'झोंबी' ते 'घरभिंती' या प्रवासपटातून प्रभावीपणे ग्रामीण जीवनाचे उभेआडवे ताणेबाणे प्रथमच त्यांतील खऱ्या छेदाभेदासकट विस्तृत प्रमाणात साहित्यरूपाने साकार होतात. त्यामुळे अंतर्बाह्य विस्तृतपणे वेध घेणारी ही आत्मचरित्रकथा ग्रामीण साहित्याच्या उद्याच्या प्रवासाची अचूक दिशा प्रभावीपणे दाखविते.

***–गो. म. कुलकर्णी***

**घरभिंती, पृष्ठे ५२७, एकशे ऐंशी रुपये**

## बहुजन समाजाच्या सांस्कृतिक उत्थानाचा अस्सल दस्तऐवज

# काचवेल

'विख्यात साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या आत्मचरित्रात्मक लेखनाचा 'काचवेल' हा चौथा खंड.... चार खंडांतून यादवांच्या साठ वर्षांचा जीवनपट उलगडलेला आहे.

....काही लेखकांच्या लौकिक आणि साहित्यिक व्यक्तिमत्त्वात एकरूपता असते; आनंद यादव त्यांपैकी एक आहेत.


....यादवांची स्वत:ची अशी निखळ जीवनदृष्टी आहे. मूलगामी आणि ताजे व्यक्तिमत्त्व घेऊन यादव जीवनाला सामोरे जातात. ते कोणत्याही इझमखाली वावरत नाहीत... त्यामुळे त्यांचे लेखन झऱ्याच्या निवळशंख पाण्यासारखे भावते. यालाच मर्ढेकरांनी 'आत्मनिष्ठा' असे नाव दिले आहे.... 'काचवेल' वाचताना हाच नितळ आणि निवळशंख अनुभव येतो आणि मन प्रसन्न होऊन जाते.

....'काचवेल'चे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे आपल्या आत्मचरित्रात्मक लेखनात यादवांनी आपल्या जीवनातील व्यामिश्र अनुभवांना आकार दिला असला तरी आपातत:च बहुजन समाजाच्या सांस्कृतिक उत्थानाचा तो एक अस्सल दस्तऐवज बनलेला आहे. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा या दस्तऐवजाचा पहिल्या दर्जाचा पुरावा म्हणून उपयोग होऊ शकेल. महाराष्ट्रातील नागरी आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या प्रत्येक जिज्ञासू स्त्रीपुरुषाने आवर्जून वाचून तो संग्रही ठेवावा अशा दर्जाचा आहे.

*—प्रा. कमलाकर दीक्षित*

**काचवेल, पृष्ठे ३३६, दोनशे रुपये**

# —: शब्दकोडे सोडवा, बक्षीस मिळवा :—



रचनाकार : श्री विजय

*स्पर्धकांना सूचना –*

हे शब्दकोडे डिसेंबर ९७चा ग्रंथजगतमधील मजकुरावर आधारलेले आहे. आपली उत्तरे कार्डावर लिहून **दि. १०एप्रिल, १९९८** पर्यंत पाठवा. त्यासाठी वरीलप्रमाणे चौकोन काढून त्यात अक्षरे लिहा. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्यांपैकी (लॉट टाकून येणाऱ्या) पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी १०० रु.ची पुस्तके बक्षीस. आमचा पत्ता : **मराठी ग्रंथजगत,** १२१६, सदाशिव, पुणे–३०.

***आडवे शब्द :***

१. ज्ञानपीठ पुरस्काराचे पहिले मराठी विजेते, 'पहिले प्रेम', 'हिरवा चाफा', 'अमृतवेल' इ. कादंबऱ्यांचे लेखक
४. वि. स. खांडेकर यांची एक गाजलेली कादंबरी
६. आनंद यादव यांचे अगदी अलीकडे प्रकाशित झालेले आत्मपर पुस्तक
७. रणजित देसाई यांची एक गाजलेली ऐतिहासिक कादंबरी
९. रणजित देसाई यांचा कथासंग्रह
१०. कवयित्री शिरीष पै यांना लहानपणी आचार्य अत्रे या नावाने हाक मारीत
११. 'बंध-अनुबंध'च्या लेखिका (फक्त नाव)
१३. अनेक उत्तम इंग्रजी ग्रंथ लिहिणारे भारताचे एक पंतप्रधान
१४. विजय कुवळेकर यांचे नाटक

***उभे शब्द :***

१. 'सखाराम बाइंडर', 'घाशीराम कोतवाल' या नाटकांचे लेखक
२. वि. स. खांडेकरांच्या रूपककथांचे पुस्तक
३. आनंद यादव यांची एक कादंबरी
५. वि. स. खांडेकरांच्या भाषणांचा संग्रह असलेले पुस्तक
८. 'माझं लंडन', 'डायाना आणि चार्ल्स' या पुस्तकांची लेखिका (फक्त नाव)
१२. महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व असलेले लेखक या आद्याक्षरांनी ओळखले जातात.



# जानेवारी १९९८ – स्पर्धेचा निकाल

## शब्दकोडे : जानेवारी १९९८चे भाग्यवंत विजेते

जानेवारी १९९८च्या अंकात एक शब्दकोडे दिले होते. त्यात रणजित देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीतील अठरा पात्रांची नावे देण्यात आली होती. ती बरोबर कळवणाऱ्या स्पर्धकांची संख्या बरीच मोठी आहे. त्यामुळे जाहीर केलेल्या २ पुरस्कारांच्या संख्येत भर घालून, एकूण पाच स्पर्धकांना पुरस्कार देण्याचे ठरवले आहे. बरोबर उत्तरे पाठवणाऱ्या स्पर्धकांपैकी पुढील पाच जणांची लॉट टाकून निवड झाली आहे. त्यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांच्या यादीतून शंभर रुपयांची पुस्तके कळवावी. ती त्यांना पाठवली जातील. सर्व स्पर्धकांचे अभिनंदन.

**'स्वामी'मधील पात्रे : बरोबर उत्तर**

माधवराव, रमा, राघोबा, रामशास्त्री, नारायणराव, नाना फडणीस, आनंदीबाई, हैदर, मैना, गोपिकाबाई, रास्ते, गंगाबाई, श्रीपती, रास्ते, सखारामबापू, होळकर, विष्णू, शिंदे

**भाग्यवंत स्पर्धक**

१) **सौ. स्वाती सुधीर वराडकर,** मु. पो. कट्टा ४१६ ६०४, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग.
२) **सौ. नयना कर्णिक,** ९९ भागीरथी प्रसाद, रानडे रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - ४०००२८.
३) **सौ. सुलोचना रामदास ताडे,** विवेकानंद विद्यालय, पो. पळसोद, ता. अकोट, जि. अकोला.
४) **सौ. लीला नंदकुमार महामुनी,** १०८/४, विद्यानगर सोसायटी, उत्तर सदरबझार, सोलापूर - ४१३००३.
५) **के. यू. बावस्कर,** हिराबाई संचेती कन्याशाळा, जि. बुलढाणा, मलकापूर - ४४३१०१.

# पुरस्कार आणि लेखक - जोड्या जुळवा

जानेवारी १९९८च्या अंकात सहा पुरस्कार प्राप्त साहित्यिकांची छायाचित्रे देऊन त्यांना मिळालेल्या पुरस्कारांची नावे कळविण्यास सांगण्यात आले होते. या स्पर्धेलाही भरघोस प्रतिसाद मिळाला.

या जोड्या पुढीलप्रमाणे होत.

१) गंगाधर गाडगीळ - जनस्थान पुरस्कार
२) विंदा करंदकर - महाराष्ट्र फाउंडेशन गौरव पुरस्कार
३) मंजुळा पद्मनाभन - ओनॅसिस ड्रामा पुरस्कार

४) रत्नाकर मतकरी - गंगाधर गाडगीळ पुरस्कार
५) महाश्वेता देवी - मॅगॅसेसे पुरस्कार
६) अरुंधती रॉय - बुकर प्राइझ

**लॉट टाकून यशस्वी ठरलेले स्पर्धक**

१) **कु. भारती त्रिंबकराव नाईकवाडी,** पो. भातंबरे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **कु. लीना कुलकर्णी,** १० राहुल, लोकसहकार नगर, दिंडोरी रोड, पंचवटी, . नासिक - ४२२००३.
३) **सुभाष आनंदराव पाटील,** मु.पो. पडळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
४) **प्रा. आर. व्ही. नेरकर,** रसिका, भूषण कार्यालयाजवळ, चाळीसगाव ४२४१०१.
५) **श्री. गौतम सुतांबे,** १६ रंगारीपुरा, वणी ४४५३०४, जि. यवतमाळ.

या स्पर्धकांनी आपल्या पसंतीची रु. १००ची पुस्तके कळवावी. ती त्यांना पाठवण्यात येतील.

## आनंद यादव यांची ग्रंथसंपदा

**आत्मचरित्र**

झोंबी
नांगरणी
घरभिंती
काचवेल

**कादंबरी**

एकलकोंडा
माऊली
नटरंग
गोतावळा

**कथासंग्रह**

माळावरची मैना
घरजावई
आदिताल
डवरणी
खळाळ
उखडलेली झाडं

**काव्य**

मळ्याची माती
मायलेकरं
हिरवे जग

**ललित गद्य**

स्पर्शकमळे
पाणभवरे
मातीखालची माती

**वैचारिक साहित्य**

ग्रामीण साहित्य : स्वरुप व समस्या
ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव
मराठी साहित्य - समाज आणि संस्कृती
साहित्याची निर्मिति प्रक्रिया
मराठी लघुनिबंधाचा इतिहास
आत्मचरित्र मीमांसा



# पुस्तकांची नावे सांगा – बक्षीस मिळवा

## नवीन स्पर्धा

आनंद यादव यांच्या काही पुस्तकांचे परिचय या अंकात दिले आहेत. त्यातील काही वाक्ये पुढे देत आहोत. ही वाक्ये कोणत्या पुस्तकाच्या परिचयात आली आहेत ते वाचकांनी ओळखून कळवायचे आहे. ज्यांची सर्व उत्तरे बरोबर असतील त्या स्पर्धकांपैकी लॉट टाकून पहिल्या तिघांना प्रत्येकी १०० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून पाठवण्यात येतील. उत्तरे कार्डावर पाठवा. मुदत – **१५ एप्रिल १९९८.**

आमचा पत्ता : मराठी ग्रंथजगत, मेहता पब्लिशिंग हाऊस,
१२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

१) संघर्षाचे एक रूप जीवनाचे भयानक दारिद्र्य व कलात्मक ऊर्जा यामधील तणावपूर्ण संबंधामध्ये दिसते.
***पुस्तक :*** ____________

२) प्रत्येक कथा समस्याप्रधान व प्रबोधनात्मक आहे.
***पुस्तक :*** ____________

३) यादवांच्या लेखनाला कोल्हापूर भागातल्या मातीचा वास येतो.
***पुस्तक :*** ____________

४) मागे पडलेले ते जुने जग आपल्या स्मृतिकोषात घट्ट पकडून ठेवण्याचा.... प्रयत्न यादव करतात.
***पुस्तक :*** ____________

५) ....या दोन प्रतिभासंपन्न लेखकांच्या कामगिरीचे विशेष विवेचन केले आहे.
***पुस्तक :*** ____________

## वाचकांना आवाहन

१९९८ सालात मेहता मराठी ग्रंथजगतचे अंक फक्त सभासदांनाच पाठविले जातील. तरी वर्गणीदारांनी व इच्छुक वाचकांनी नवीन वर्षाची वर्गणी (५० रुपये व भेट पुस्तकाचे पोस्टेज १५ रुपये) मनीऑर्डरद्वारा त्वरित पाठवावी.

बैंक ऑफ महाराष्ट्र
सेवा में प्रस्तुत कर रही हैं -
आपके सुख के लिए, आपकी समृद्धीके लिए

जमा
मिक्सी
यो ज ना
**मिक्सी डिपॉजिट**
जब भी आपको जरूरत पडे,
अपनी सावधि जमा की
७५% तक रकम चेक द्वारा
निकालने की अनोखी सुविधा
वाली नयी योजना

जमा
योजना
सुलभ
**सुलभ जमा योजना**
न कोई नियम,
न कोई शर्त ....
आसान
आवर्ती जमा

शीतल
ज मा यो ज ना
**शीतल जमा योजना**
नवीकरण, रकम निकालने
की सुविधा और ब्याज का
लाभ भी पाइए .... साथ
ही, अपना सावधि जमा
भी जारी रखिए

**बैंक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकार का उपक्रम)
**प्रधान कार्यालय :**
'लोकमंगल', १५०१, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५.



◆ वर्ष दुसरे ◆ अंक तिसरा ◆ मार्च १९९८


## अनुक्रम


| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| साहित्यवार्ता | ५ |
| आनंद यादव : लेख-डॉ. रवींद्र ठाकूर | १३ |
| पुस्तकपरिचय | २० |
| मानसन्मान | ५१ |
| स्पर्धा, निकाल | ५३ |
| नवीन स्पर्धा | ५५ |
| एक आकर्षक ऑफर | ५६ |



◆ **कार्यकारी संपादक**
शंकर सारडा

◆ **संपादन सहाय्य**
सुनीता दांडेकर

◆ **मांडणी**
बाबू उडुपी

◆ **या अंकाची किंमत ५ रु.**
वार्षिक वर्गणी ५० रु.

◆ वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी

◆ दरमहा १५ तारखेस हे मासिक प्रसिद्ध होईल

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
फोन : ४७६९२४

**संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,** मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव, पुणे ३०.
**अक्षरजुळणी : पीसी-नेट,** नारायण पेठ, पुणे ३०.
या अंकातील लेखकांची मते ही ज्याची त्याची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

# डॉ. आनंद यादव

*संपूर्ण नाव* : आनंद रतन यादव
*जन्म* : ३० नोव्हेंबर, १९३५ (कागल, जि. कोल्हापूर)
*शिक्षण* : एम्.ए. (मराठी-संस्कृत), पीएच.डी. (मराठी)
पुणे विद्यापीठ, मराठी विभाग प्रमुख, (निवृत्त)

## मानसन्मान आणि पुरस्कार

- **अध्यक्ष** : जुन्नर ग्रामीण साहित्य संमेलन, १९८०
- **अध्यक्ष** : असोदा ग्रामीण साहित्य संमेलन, १९८१
- **अध्यक्ष** : विटा येथील नववे ग्रामीण साहित्य संमेलन, १९८४
- **अध्यक्ष** : चौथे दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन, बेळगाव, १९८६
- **अध्यक्ष** : पहिले दलित-आदिवासी-ग्रामीण साहित्य संमेलन-साक्री (धुळे), १९८७
- **अध्यक्ष** : चौथे अखिल भारतीय मराठी जनसाहित्य संमेलन, भंडारा (विदर्भ), १९९०
- **अध्यक्ष** : चिकोत्रा खोरे ग्रामीण साहित्य संमेलन, १९९२
- **अध्यक्ष** : तिसरे कामगार साहित्य संमेलन, नाशिक, १९९४
- **अध्यक्ष** : एक्कावन्नावे औदुंबर साहित्य संमेलन, औदुंबर, १९९४
- **अध्यक्ष** : मराठी ग्रामीण साहित्य परिषद, पुणे (१९८९ पासून)
- **संपादक** : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचे मुखपत्र
  महाराष्ट्र साहित्य पत्रिका. (१९७९ ते १९८२)
- **संपादक** : विचारभारती (मासिक), पुणे (१९८७ ते १९८९)

**माजी कार्यकारिणी सदस्य** : राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य
**माजी कार्यकारिणी सदस्य** : जागतिक मराठी अकादमी, मुंबई.
**माजी सदस्य** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, संपादन समिती, पुणे.
**माजी सदस्य** : महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
**माजी सदस्य** : महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, मुंबई.

- महाराष्ट्र राज्य सरकारची विविध साहित्य प्रकारांतील एकूण दहा पारितोषिके.
- पीएच.डी.च्या संशोधनपर सर्वोत्कृष्ट प्रबंधास पुणे विद्यापीठाची दोन पारितोषिके.



- साहित्य-संस्था व प्रकाशन संस्था यांची नऊ परितोषिके.
- राष्ट्रीय हिंदी अकादमी, कलकत्ता द्वारे उत्कृष्ट मराठी साहित्यनिर्मितीबद्दल सन्मान, १९९४.
- प्राथमिक, माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात अनेक साहित्यकृतींचा व ग्रंथांचा अभ्यासासाठी व संदर्भासाठी समावेश.
- अनेक विद्यापीठांतून त्यांच्या साहित्यावर एम.फिल. व पीएच.डी चे प्रबंध.
- विशेष ग्रंथकार म्हणून अनेक विद्यापीठांत एम.ए.साठी अभ्यासक्रमात स्थान.
- अनेक साहित्यकृतींचा कन्नड, उर्दू, तेलुगू, हिंदी, इंग्रजी, जर्मनमध्ये अनुवाद.
- 'टाइम्स ऑफ इंडिया' प्रकाशनाच्या 'सारिका' या सर्वात लोकप्रिय हिंदी मासिकाच्या, कथास्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार.
- भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, दिल्ली तर्फे प्रकाशित 'भारतीय कहानियाँ' या संग्रहात कथेचा समावेश.
- 'झोंबी'स १९९० चा साहित्य अकादमी व राज्य यांच्यासह एकूण नऊ पुरस्कार.

## हातात हात घालून जाणारे जीवन आणि साहित्य

आनंद यादव आपल्या परीने वाढले, त्यांनी स्वत:ला घडविले, ग्रामीण जनतेची सुखदु:खे, त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांच्या जीवनजाणिवा यांचे सजग भान ठेवून लेखन केले. त्यांची ग्रामीण साहित्याकडे पाहण्याची दृष्टी पारंपरिक स्वरूपाची नाही, भाबडेपणाची नाही. तिच्यात अनाठायी पूर्वगौरवाची वृत्ती नाही. त्यांना ग्रामीण साहित्यातील बाजारूपणाची घृणा येते आणि त्याच्या अस्सलपणाबद्दल मनापासून आनंद वाटतो. त्यांची प्रगल्भ संवेदनवृत्ती, प्रयोगशील साक्षेपी प्रकृती, अनुभव घेण्याच्या पद्धतीतील वेगळेपणा, सूक्ष्म-मार्मिक निरीक्षणाचा चौफेर आवाका, क्वचित प्रसंगी नर्म, उपरोधगर्भ-उपहासात्मक निवेदनाचा केलेला वापर आणि स्वत:ची खास मुद्रा असलेली भाषाशैली अशा विविध लक्षणांनी त्यांच्या लेखनाची गुणवत्ता सिद्ध झाली आहे. त्यांच्या साहित्यनिर्मितीवर त्यांच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वाचा स्पष्ट ठसा उमटलेला आहे.

यादवांना बदलत्या समाजजीवनाचे तीव्र भान आहे. म्हणून त्यांच्या 'इंजेन'मध्ये यंत्रयुगाच्या आगमनाची चाहूल लागते आणि 'गोतावळा'त त्याच्या आक्रमणामुळे झालेल्या कृषिसंस्कृतीच्या एका युगान्ताचे दर्शन घडते. 'उखडलेली झाडे' आणि 'मायलेकरं' ह्या साहित्यकृतीतून वर्तमान मराठी खेड्याचे, स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागातील अध:स्तरीय समाजघटकांच्या वाट्याला येणाऱ्या शोषणाचे, लोकसंस्कृतीवरील नागरी संस्कृतीच्या आक्रमणाचे कलात्मक चित्रण आढळून येते. ह्या विद्यमान सामाजिक जाणिवांचे प्रत्यंतर त्यांच्या सृजनात्मक आणि समीक्षणात्मक साहित्यातून प्रकर्षाने येते म्हणून ते युगसमांतर आहे, असे म्हणता येईल. युग-जाणिवांच्या अभिव्यक्तीमुळे त्यांच्या साहित्यात जशी पृथगात्मता दिसून येते, त्याचप्रमाणे त्यांच्या जागरुक कलात्म जाणिवांमुळे त्यात प्रयोगशीलताही प्रकटली आहे. ही प्रयोगशीलता कधी आशयाच्या अंगाने प्रकट होते, तर कधी ती अभिनव अभिव्यक्तीचे रूप धारण करते.

आनंद यादवांच्या लौकिक जीवनाचा प्रवाह आणि त्यांच्या साहित्यनिर्मितीचा प्रवास यांची वाटचाल नुसती समांतरच झाली नाही, तर त्यांनी ती हातात हात घालून केली आहे. म्हणून त्यांचे व्यक्तिगत आयुष्य त्यांच्या वाङ्मयीन जीवनात स्वच्छपणे प्रतिबिंबित झाले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबरोबरच त्यांचा लेखनप्रवासही विकासशील होत गेला. जणू लेखणी ही त्यांची दुसरी सहचरी आहे, तिने त्यांच्या जीवनसंघर्षाच्या वाटेवर दु:खात सोबत करणाऱ्या प्रणयिनीची



भूमिका पार पाडली आहे, परात्मतेची कळ सोसण्यास अक्षरांचे बळ दिले आहे. थोडक्यात, त्यांची साहित्यनिर्मिती ही त्यांच्या वैयक्तिक जीवनाची वाङ्मयीन प्रतिकृती आहे, असे म्हणता येईल. कारण त्यांचे आयुष्य ही त्यांच्या साहित्याची प्रेरणा आहे. त्यांच्या साहित्यनिर्मितीचा जणू तो आस आहे. भूमीचे आकर्षण, झाडाचे उखडलेपण-जरासंधाचे दुभंगलेपण आणि श्रमिक-शोषित ग्रामीण समाजाविषयी मातृभाव ही अंत:संगती वा विकासक्रम त्यांनी हाताळलेल्या कोणत्याही वाङ्मयप्रकारात कमी-अधिक प्रमाणात आढळून येतो. ही अर्थपूर्ण एकात्मता यायला त्यांचे या मातीवर निष्ठा असलेले, अस्सल भूमिपुत्राचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व कारणीभूत आहे. कारण त्यांची साहित्यनिर्मिती म्हणजे त्यांच्या विकासानुगामी वैचारिक व्यक्तिमत्त्वाचा वाङ्मयीन आविष्कार आहे.

आनंद यादवांच्या साहित्याचे वेगळेपण हे की, त्यातील 'साहित्य'पणाइतकेच 'मराठी' पणही महत्त्वाचे आहे. मराठी मातीचे सत्त्व आणि स्वत्त्व घेऊन ते अवतरले आहे. त्यांची परात्मतेची वेदना ही उसनी नाही. तसेच ती केवळ तत्त्वज्ञानाच्या कोरड्या पातळीवरची नाही किंवा पाश्चात्यांकडून आयात केलेली नाहा. ती अस्सल आहे, खास देशी आहे. तिला या मातीचा वास आणि रंग आहे. त्यांची प्रगतिशील विचारांकडील, पुरोगामी मूल्यांकडील वाटचालही पुस्तकी नाही, संकल्पनेच्या पातळीवरची नाही. प्रत्यक्ष जगताना या विचारांची रत्ने त्यांना स्वत:च्या अनुभवातून गवसलेली आहेत. आणि मुख्य म्हणजे या विचारांच्या मर्यादांचे त्यांना भान आहे. या देशाच्या सांस्कृतिक संचिताची त्यांना जाण आहे. त्याचप्रमाणे आंतरिक व्यक्तिमत्त्वाचे, भावनिक विश्वाचे आणि कलात्मकतेचे महत्त्व ते चांगले जाणून आहेत.

*(आनंद यादव : साहित्य आणि जीवन या ग्रंथातून)*

**—डॉ. एस. एम. कानडजे**